वि.स. ४९ (1)

अतारांकित प्रश्नोत्तरांची ४९ वी यादी

# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२६**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेतील प्रलंबित देयकाबाबत

**(१) १९९३ (१७-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दावोस येथे सन २०२४ मध्ये झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्र शासनाच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.उद्योग मंत्री यांनी सहभागी होऊन राज्यात गुंतवणूक आणण्यासाठी अनेक सामंजस्य करार करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील दौऱ्यातील खर्चाच्या प्रलंबित देयका संदर्भात मे.स्काह जीएमबीएच या कंपनीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला कायदेशीर नोटीस बजावली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने आयोजित केलेल्या सदरील दावोस दौऱ्याचा खर्चाचा तपशीलवार माहिती देण्यात यावी,

(४) असल्यास, सदरील दौऱ्यातील खर्चाच्या प्रलंबित देयका संदर्भात दिलेल्या नोटीस बाबत शासनाची भूमिका काय आहे तसेच, किती देयके (बिले) प्रलंबित आहेत ?

**श्री. उदय सामंत (०१-०७-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मे.स्काह जीएमबीएच, स्वित्झर्लंड व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेमध्ये कोणताही करार अथवा पत्रव्यवहार झालेला नाही, तरीही सदर कंपनीने महामंडळास बेकायदेशीर नोटीस पाठविलेली आहे.

(३) जागतिक आर्थिक परिषद-२०२४, दावोस स्वित्झर्लंड या दौऱ्यासाठी एकूण रूपये १८,१६,५१,०१८/- एवढा खर्च झाला असून, त्यामध्ये पॅव्हेलियन आरक्षण, डिफायनिंग व फॅब्रीकेशन, प्रवास व विमा, प्रसिध्दी मोहिम, निवास व्यवस्था इतर गोष्टींचा समावेश आहे.

(४) मे.स्काह जीएमबीएच, स्वित्झर्लंड यांनी ज्यूरिस वीझ या कायदेशीर सल्लागारांकडून प्रलंबित देयकांच्या अदायगीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला कायदेशीर सूचना पाठविली आहे. तथापि, मे.स्काह जीएमबीएच व महामंडळ यांचेदरम्यान कोणताही थेट करारनामा झालेला नाही.

जागतिक आर्थिक परिषद-२०२४, दावोस स्वित्झर्लंड येथे सहभागी होण्यासाठी शिष्टमंडळासाठी महामंडळाने सूचीबध्द बसलेल्या टुर्स व ट्रॅव्हल संस्थेमार्फत आवश्यक सर्व सेवा उपलब्ध करून घेण्यात आल्या होत्या. प्रलंबित देयकापोटी स्वीस कंपनीला महामंडळास नोटीस बजावण्याचा कोणताही अधिकार नाही. तसेच महामंडळाने इतर कोणत्याही परकीय संस्थेशी कोणताही करार केलेला नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व मे.स्काह जीएमबीएच यांचे दरम्यान कोणताही करार झालेला नसताना देखील जागतिक आर्थिक परिषद – २०२४, दावोस स्वित्झर्लंड या दौऱ्यातील खर्चाच्या प्रलंबित देयकाबाबत स्वीस कंपनीने कायदेशीर नोटीस बजावणे निरर्थक आहे. सदर दौऱ्याचा सर्व व्यवस्थेचा खर्चाची

तपासणी करून महामंडळाच्या पुरवठादार पॅनेलवरील संस्थेस यापूर्वी अदा केला आहे, त्यामुळे सदर दौऱ्याची कोणतीही देयके प्रलंबित नाहीत.

---

### श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणेबाबत

**(२) २३१७ (३०-०४-२०२५). श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये सन २०२३-२४ या कालावधीमध्ये ६६४८७ रुग्णांनी उपचार घेतले तथापि सदर आकडेवारीचा विचार करता येथे उपचाराकरिता येणाऱ्या रुग्णांची संख्या फार जास्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालय ५० खाटांचे मंजूर असल्याने वाढत्या रुग्ण संख्येमुळे रुग्ण उपचारावर परिणाम होत असून खाटांची संख्या कमी असल्याने व तज्ञ डॉक्टरांची नेमणूक करण्यात अडचण असल्यामुळे बऱ्याच गरीब गरजू रुग्णांना प्रतिवर्षी जिल्हा रुग्णालयात पाठवावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयाचे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करुन तज्ञ डॉक्टरांची नेमणूक केल्यास गरीब गरजू रुग्णांना श्रीगोंदा येथेच उपचार मिळतील, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयाचे श्रेणीवर्धन होवून १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय होणेसाठी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२२-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) ग्रामीण रुग्णालय, श्रीगोंदा, जि. अहिल्यानगरचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करणेबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयाच्या दिनांक २७/०६/२०२४ अन्वये शासनास प्राप्त झालेला आहे.

सार्वजनिक आरोग्य सेवेच्या पायाभुत सुविधांबाबत नियोजित पध्दतीने कामे करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शासनाने दिनांक २९/०५/२०२५ अन्वये असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, आधीच हाती घेण्यात आलेली बांधकामे पूर्ण करुन त्या-त्या ठिकाणी आरोग्य सेवा तातडीने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. त्यामुळे सद्य:स्थितीत नवीन संस्था मंजुरी व बांधकामे हाती घेण्यात येणार नाहीत. तथापि, चालू बांधकामे पूर्ण झाल्यानंतर आवश्यक त्याठिकाणी नवीन बांधकामे करण्यात येतील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री (पीएम) विश्वकर्मा योजनेंतर्गत वित्तीय संस्था कर्ज देत नसल्याबाबत

**(३) २८०६ (१७-०४-२०२५). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री (पीएम) विश्वकर्मा योजनेंतर्गत ९००० च्या वर अर्जदारांनी नोंदणी केलेली असून त्यापैकी केवळ ३००० कर्ज प्रकरणे मंजूर केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित कर्ज प्रकरणांमध्ये अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याने अर्जदारांना सतत

वित्तीय संस्थेत जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कर्ज प्रकरणे मंजूर न करण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच, ज्या वित्तीय संस्थांनी कर्ज प्रकरणे मंजूर केली नाही त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१०-०६-२०२६) :** (१) केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम मंत्रालयाकडून विकसित करण्यात आलेल्या पी एम विश्वकर्मा पोर्टलवर राज्यातील २४,१८,२८० कारागिरांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यापैकी २,६६,१७९ अर्जांना सुक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून अंतिम मंजूरी प्राप्त झाली असून प्रशिक्षण झालेल्या १,१७,४१० कारागिरांचे अर्ज वित्तीय संस्थांकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आले आहेत. वित्तीय संस्थांकडून त्यापैकी ३०,५३६ कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत.

बुलढाणा जिल्ह्यातील १,१८,९१२ कारागिरांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यापैकी १६,७१९ अर्जांना सुक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून अंतिम मंजूरी प्राप्त झाली असून प्रशिक्षण झालेल्या ९८२५ कारागिरांचे अर्ज वित्तीय संस्थांकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आले आहेत. वित्तीय संस्थांकडून त्यापैकी २,५५८ कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत.
(२) या योजनेतील लार्भाथ्यांना कर्ज पूरवठा करण्याचे काम पूर्णपणे केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या अखत्यारीतील वित्तीय संस्थांद्वारे करण्यात येते. योजनेच्या धोरणा नुसार विविध वित्तीय संस्थांना केंद्र शासनाने त्यांना दिलेल्या मार्गदर्शिका सूचनेनुसार कर्ज प्रकरण मंजुरीची व पूरवठ्याची कार्यवाही करत असतात. लार्भाथ्यांच्या प्रकरणांचे स्टेटस त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे पाठविले जात असते, त्यामुळे अर्जदारांना सतत वित्तीय संस्थेत जाण्याची आवश्यकता नाही.
(३) पी एम विश्वकर्मा योजनेंतर्गत कर्ज प्रकरणे मंजूर करण्यासाठी संबंधित बॅंका या केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करतात आणि त्याबाबतचा अहवाल/माहिती केंद शासनास सादर करतात. यासाठी सदर वित्तीय संस्था महाराष्ट्र शासनाला प्रामुख्याने जबाबदार नसल्याने सदर प्रकरणे मंजूर न करण्याची कारणे राज्य शासनास सादर करण्यात येत नाहीत. तसेच पी एम विश्वकर्मा पोर्टलवर देखिल उपलब्ध होत नाहीत. या संबंधीचा आढावा केंद्र शासनाचा वित्त सेवा विभाग घेत असतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वांद्रे पूर्व येथील बि. के. सी. परिसरातील कार्यालयात स्थानिक भूमिपुत्रांना नोकरीत सामावून घेण्याबाबत

**(४) ४२८६ (२४-०४-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांद्रे पूर्व येथील बि. के. सी. पीरसरात राज्याचे औद्योगिक हब निर्माण झाले असून येथे शासनाची अनेक महत्वाची कार्यालये कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याठिकाणी स्थानिक भूमिपुत्रांना नोकरीत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणतेही धोरण तयार केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बि. के. सी परीसरातील कार्यालयात स्थानिक भूमिपुत्रांना नोकरीत सामावून घेण्याबाबत धोरण तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१०-०६-२०२६) :** (१) वांद्रे पूर्व येथील बि.के.सी. परिसरात शासकिय, निमशासकीय - कार्यालये, व्यापारी कार्यालये, बँका, वित्तीय संस्थांची कार्यालये तसेच - औद्योगिक उपक्रमांची नोंदणीकृत कार्यालये, अशी विविध कार्यालये आहेत.
(२) औद्योगिक विकासातून होणाऱ्या आर्थिक फायद्यामध्ये महाराष्ट्रातील स्थानिक लोकांना योग्य हिस्सा मिळावा तसेच स्थानिक लोकांचा बेरोजगार कमी व्हावा या दृष्टीकोनातून स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याचे धोरण राज्यशासनाने सन १९६८ पासून अवलंबिले आहे. या धोरणाची परिणामकारकपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने शासन निर्णय क्रमांक स्था.लो.रो./२००८/प्र.क्र.९३/उद्योग-६, दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ अन्वये सुधारित कार्यपध्दती जाहिर केली आहे.

महाराष्ट्र राज्यात कमीतकमी १५ वर्ष वास्तव्य असलेली व्यक्ती स्थानिक व्यक्ती म्हणून समजली जाते. सदर सुधारित कार्यपध्दतीनुसार सर्व औद्योगिक उपक्रमांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीय श्रेणीसहित इतर श्रेणीत किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन वांद्रे पूर्व येथील बि.के.सी. परिसरात शासकिय, निमशासकीय कार्यालये, व्यापारी कार्यालये, बँका, वित्तीय संस्थांची कार्यालये तसेच औद्योगिक उपक्रमांची नोंदणीकृत कार्यालये ही औद्योगिक उपक्रमांमध्ये येत नसल्याने सदर शासन निर्णय लागू होत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केज (जि.बीड) येथील उपजिल्हा रुग्णालयातील नियमबाह्य स्वेच्छा निवृत्ती रद्द करणेबाबत

**(५) ५५०६ (३०-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि.बीड) येथील उपजिल्हा रुग्णालयातील डॉ. प्रतिभा पाटील यांनी विभागीय चौकशी चालू असताना स्वेच्छानिवृत्ती घेण्याबाबत त्यांनी केलेला अर्ज मंजूर करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांच्या सोबत डॉ. अशोक थोरात यांचीही विभागीय चौकशी चालू होती परंतू चौकशी चालू असल्याकारणाने त्यांना स्वेच्छा निवृत्ती नाकारली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डॉ. प्रतिभा पाटील यांची स्वेच्छानिवृत्ती अर्ज कोणत्या नियमाने मंजूर करण्यात आला,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून नियमबाह्य केलेली स्वेच्छा निवृत्ती रद्द करणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (०८-०५-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे,

डॉ. प्रतिभा पाटील यांनी अर्ज दिनांक ०५/१०/२०२० अन्वये शासनास स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस सादर केलेली आहे. शासन पत्र दिनांक ३०/१२/२०२० रोजी त्यांची स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस अमान्य केलेली आहे. तथापी त्यांचे विरुध्द सुरू असलेली विभागीय चौकशी अंतिम करण्यात आली असून त्यांना समज

देण्यात येऊन विभागीय चौकशी प्रकरण बंद करण्यात आले आहे. त्यामुळे, डॉ. प्रतिभा पाटील यांची स्वेच्छा सेवा निवृत्ती मान्य करण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

शासन पत्र क्र. स्वसेनि-१३२४/प्र.क्र.२०४/सेवा-२ दिनांक १९/०६/२०२४ अन्वये शासनाने आरोग्य विभागातील रिक्त पदे व आरोग्य सेवेची निकड विचारात घेता, त्यांच्या सेवेची शासनास आवश्यकता असल्याने तसेच त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी कार्यवाही सुरु असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,१९८२ मधील तरतुदीनुसार डॉ. अशोक थोरात यांच्या स्वेच्छा सेवा निवृत्तीचा प्रस्ताव अस्वीकृत केला आहे.

(३) महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती नियम १९८२ मधील नियम ६६(१)(२)(५) मधील तरतुदी नुसार स्वेच्छा निवृत्ती मंजुर करण्यात आलेली आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) व (६) म. ना. से. नियम १९८२ मधील नियम ६६ (१) (२) (५) मधील तरतुदीनुसार कार्यवाही केली असल्याने, पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील उपजिल्हा रुग्णालयात आवश्यक असलेल्या आरोग्याच्या सोई सुविधा उपलब्ध करणेबाबत

**(६) ५६१० (३०-०४-२०२५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील उपजिल्हा रुग्णालयात सोनोग्राफी व डायलेसिस सेंटर उपलब्ध नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर रुग्णालयात सोनोग्राफी व डायलेसिस सेंटर व सेंटर चालविण्याकरिता तज्ञ डॉक्टर उपलब्ध करून देण्याबाबत तसेच आरोग्यसंबंधी अन्य सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२५-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, पांढरकवडा येथे सोनोग्राफी मशीन उपलब्ध आहे. सद्य:स्थितीत सदरहू रुग्णालयात सोनोग्राफी तज्ञ उपलब्ध नाही परंतू खाजगी स्त्रीरोगतज्ञाकडून रुग्णालयांमध्ये येणा-या रुग्णांना सोनाग्राफी सेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

तसेच, डायलेसिस सेंटर स्थापित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) उपजिल्हा रुग्णालय, पांढरकवडा येथे रुग्णांनी सोनोग्राफी सेवा देणेकरीता खाजगी स्त्रीरोग तज्ञांची मानधन तत्वावर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील जिल्हा रुग्णालयात रक्त तपासणी मशीनींची दुरुस्ती करुन कार्यान्वित करणेबाबत

**(७) ६३७० (०५-०५-२०२५). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील जिल्हा रुग्णालयातील रक्त तपासणी लॅबमधील तीनही मशिनमध्ये बिघाड झाल्यामुळे रुग्णांना रक्त तपासणीचे अहवाल वेळेत मिळण्यास अडचणी येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मशिनींच्या दुरुस्तीकरीता साडेचार लाख रुपयांचा खर्च येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर रुग्णालयातील रक्त नमुने तपासणा-या मशीनींची दुरुस्ती करून कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२३-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, नाशिक येथील रक्त तपासणीच्या ४ मशीनपैकी ३ मशीन नादुरुस्त झाल्या ही बाब खरी आहे. परंतु, सुरळीत सुरु असलेली १ मशीन व सेवा पुरवठादार कंपनीमार्फत रुग्णालयांतील रुग्णांची रक्त तपासणी करण्यात येत असून रक्त तपासणीचे अहवाल रुग्णांना उपलब्ध करुन दिले जातात.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हा रुग्णालय, नाशिक येथील रक्त तपासणीच्या मशीन्सच्या दुरुस्तीसाठी रु.४,७२,०००/-एवढा खर्च येणार असून जिल्हा स्तरावरील प्राप्त निधीतून मशीन दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यात प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांना टूल किटिमळणेबाबत

**(८) ७२२५ (१९-०९-२०२५). श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेंतर्गत प्रशिक्षण पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांना टूल किट वाटप करण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रशिक्षण पूर्ण करूनही लाभार्थ्यांना टूल किट वाटप करण्यात आले नसल्याने ते स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास असमर्थ असल्याने ते आर्थिक अडचणीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टूल किटसाठी प्रतिक्षा करावी लागत असल्याने अनेक लाभार्थ्यांनी वारंवार जिल्हा प्रशासन व संबंधित विभागांकडे पाठपुरावा केला असूनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१०-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतील लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या कौशल्य विकास आणि उद्यमशिलता

मंत्रालयाअंतर्गत असणा-या राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाकडून प्रशिक्षण दिले जाते आणि सुक्ष्म, लघु, मध्यम आणि उद्योग मंत्रालयाकडून लाभार्थ्यांना टूलकिटचे थेट वाटप केले जाते.

बीड जिल्ह्यात प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेअंतर्गत ३९६१ लाभार्थ्यांचे प्रशिक्षण पुर्ण झाले आहे. त्यापैकी २०८ लाभार्थ्यांना टूल किट वाटप करण्यात आले आहेत. उर्वरीत लाभार्थ्यांना सुक्ष्म, लघु, मध्यम आणि उद्योग मंत्रालयाकडून इंडीया पोस्टद्वारे टूल किट वाटप ची प्रक्रिया सुरु आहे.

(२) वरीलप्रमाणे.

(३) प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून केद्र शासनाकडे नियमित पाठपुरावा करण्यात येतो.

(४) वरील प्रमाणे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विविध रुग्णालयांत रिक्त पदे भरणेबाबत**

**(९) ७३४९ (१९-०९-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.किसन वानखेडे (उमरखेड), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.करण देवतळे (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.राहूल कुल (दौंड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारताचे नियंत्रक व लेखापरिक्षण यांच्या अहवालानुसार सार्वजनिक आरोग्य विभागात व वैद्यकीय शिक्षण विभागाकडे ११,३९४ मंजूर पदापैकी केवळ ८,३३० डॉक्टर्स कार्यरत असून त्यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागात ७,६७२ डॉक्टरांपैकी ५,९८९ डॉक्टर्स तर वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागात ३,७२२ पैकी २,३४१ डॉक्टर्स कार्यरत असून डॉक्टरांबरोबरच परिचारीका आणि निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांची संख्या देखील पुरेशी नसल्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात आरोग्य क्षेत्रात सुधारणा आणण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य धोरण, २०१७ च्या धर्तीवर आरोग्य धोरण असणे गरजेचे असताना सदर आरोग्य धोरण अद्यापही तयार करण्यात आले नसल्याचे ही कॅगने सदर अहवालात नमुद केले आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्त्री रोग विभागात तज्ज्ञ डॉक्टरांची संख्या अपुरी असल्याने महिलांना आजाराचे निदान व त्यावर उपचार घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासकीय रुग्णालयामधील एकूण मंजूर पदांपैकी परिचारिकांची हजारो पदे रिक्त असल्याने एका परिचारिकेला १५ ते २० रुग्णांची जबाबदारी पार पाडावी लागत असल्याने त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याने त्याचा परिणाम रुग्ण सेवेवरही होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश आबिटकर (०८-०५-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत तज्ञ डॉक्टरांच्या मनुष्यबळाची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| म.वै.व.आ.से. गट-अ (एस-२३) | ६७७ | ३०२ | ३७५ |
| म.वै.व.आ.से. गट-अ (एस-२०) | ३२९३ | २०६५ | १२२८ |

वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०) यांची सद्य:स्थितीत ८७६४ पदे मंजूर असून त्यापैकी ७६६८ पदे भरलेली आहेत तसेच १०९६ पदे रिक्त आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागातील विविध रुग्णालयांतर्गत माहे मे-२०२५ अखेर परिचारीका संवर्गातील एकूण १२०७७ पदे मंजूर असून, १००१३ पदे भरलेली आहेत. तसेच निम वैदयकीय कर्मचारी व तांत्रिक यांची १६७६२ पदे मंजूर असून, १३५९७ पदे भरलेली आहेत.

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागांतर्गत पदांची सद्य:स्थिती खालील प्रमाणे आहे.

| पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| प्राध्यापक | ८७८ | ४८२ | ३९६ |
| सहयोगी प्राध्यापक | १५८६ | १०५५ | ५३१ |
| सहायक प्राध्यापक | २५७९ | १०८२ | १४९७ |
| एकूण | ५०४३ | २६१९ | २४२४ |

वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अंतर्गत संस्थांकरीता स्पर्धा परिक्षा २०२३ मधून एकुण ४००० अधिपरीचारीकांची पद भरती करण्यात आली आहे. तसेच माहे डिसेंबर २०२४ मध्ये ८३६ अधिपरिचारीकांना परिचारीका या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

सर्वांना समान, परवडणाऱ्या आणि दर्जेदार सेवा गिळण्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय आरोग्य धोरण-२०१७ जाहिर केलले आहे. त्यांतर्गत सर्व नागरिकांना परवडणाऱ्या दर्जेदार आरोग्य सुविधा प्रदान करण्याची तरतुद आहे. त्या धोरणानुसार राज्यात उपकेंद्र/प्रा.आ. केंद्र / उ.जि.रु. / जि.रु. / जि.स्त्री.रु / मनोरुग्णालय / विभागीय संदर्भसेवा व आरोग्य संस्थामार्फत आरोग्य सेवा पुरविल्या जातात. तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाच्या रुग्णालयातही रुग्णसेवा सुरळीतपणे चालू आहेत.
(३) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत स्त्री रोग तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची (एस-२३) ७५ मंजूर पदे असून

४३ पदे भरलेली आहेत. स्त्री रोग तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची (एस-२०) ६८६ मंजूर पदे असून ५५५ पदे भरलेली आहेत. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत कंत्राटी स्त्रीरोग तज्ञांची राज्यात ११५ पदे कार्यरत आहेत.

वैद्यकीय शिक्षण विभागाअंतर्गत राज्यातील विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात स्त्रीरोग तज्ञ व प्रसुती शास्त्र विभागात अध्यापकांची २८४ पदे मंजूर असून बहूतांश पदे भरण्यात आलेली आहेत.

(४) परिचारिकांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) विविध संवर्गातील पदे भरण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला (एमआयडीसी) आर्थिक नुकसान झाल्याबाबत

**(१०) ७४१२ (१९-०९-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये सुमारे रु. ७ हजार ३३७ कोटी इतके नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळ तोट्यात जाण्याची कारणे काय आहेत व महामंडळास होणारा तोटा कमी करून नफा वाढवण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या व करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०५-२०२६) :** (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या अनुषंगाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रु.१४१६.८२ कोटी इतकी तूट आहे.

(२) १. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ नुसार महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक क्षेत्रात व औद्योगिक वसाहतीत उद्योगधंद्याची पध्दतशीर स्थापना आणि त्यांची घडण करण्याच्या आणि त्यासाठी मदत देण्याच्या प्रयोजनाकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

२. महामंडळाला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रु.१२५८.७७ कोटी इतकी महसूली जमा प्राप्त झाली असून रु.२२५९.७१ कोटी इतका महसूली खर्च झालेला आहे. त्यानुसार, रु.१०००.९५ कोटी इतकी महसूली तूट आली आहे.

३. महसूली खर्चामध्ये महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये केला जाणारा देखभाल व दुरुस्ती खर्च वाढलेले पाण्याच्या रॉयल्टीचे दर व वीजेचे दर आणि कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अशा प्रमुख बाबींचा समावेश होतो. सदरचा खर्च अनिवार्य असल्यामुळे तूट दिसून येते.

४. महामंडळाला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रु.४४६७.०८ कोटी इतकी भांडवली जमा प्राप्त झाली असून रु.४८८२.९५ कोटी इतका भांडवली खर्च झालेला आहे. त्यानुसार, रु.४१५.८७ कोटी इतकी भांडवली तूट आली आहे.

५. भांडवली खर्चामध्ये महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये बांधल्या जाणाऱ्या रस्ते, पथ दिवे, पाणी पुरवठा योजना, जलनिःसारण योजना, ईमारती अशा प्रमुख बाबींचा समावेश होतो. राज्याच्या औद्योगिक विकासाच्या धोरणाच्या अनुषंगाने सदरचा खर्च करण्यात आला आहे.

६. सदरची तूट महामंडळाकडे असलेल्या उपलब्ध मुदत ठेवींमधून भरुन काढण्यात आली आहे.

७. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आर्थिक स्थितीच्या अनुषंगाने राज्य शासनाकडून

महामंडळास अनुदान वा अर्थसहाय्य मिळणेसाठी मऔवि महामंडळाच्या दिनांक २४/०९/२०२४, ०६/०१/२०२५ व १८/०६/२०२५ च्या पत्रांन्वये विनंती करण्यात आली आहे.

८. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ०९/०५/२०२५ रोजीच्या ४०६ व्या बैठकीमध्ये मऔवि महामंडळास स्वतःसाठी अर्थप्राप्तीचे पुरेसे मार्ग प्राप्त करुन घेण्यासाठी कर्ज प्राप्त करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंहगड किल्ला घेरा सिंहगड पाणीपुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत

**(११) ७५६४ (३०-०७-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहगड किल्ला घेरा (ता.हवेली, जि.पुणे) सिंहगड पाणीपुरवठा योजना गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून या योजनेची अंमलबजावणी तातडीने करण्यासाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे,

(२) असल्यास, सदर योजनेस अद्याप प्रशासकीय मान्यता प्राप्त नसताना निविदा प्रक्रिया पार पाडण्यात आली असून शासन मान्यता व निविदा प्रक्रियेतील सुसंगती कशी राखली जाणार तसेच या प्रक्रियेतील पारदर्शकतेची चौकशी कोणत्या यंत्रणेमार्फत केली जाणार आहे,

(३) असल्यास, सदर योजनेसंदर्भातील निर्णय घेताना स्थानिक लोकप्रतिनिधींचा सहभाग नोंदविला गेला नाही यामागील कारणे काय तसेच भविष्यात स्थानिक लोकप्रतिनिधींचा सहभाग निश्चित करण्यासाठी शासन कोणती हमी देणार आहे,

(४) असल्यास, सदर योजनेत समाविष्ट करण्यात आलेल्या कामांची यादी, त्यांचे स्वरूप व प्राधान्यक्रम काय तसेच या कामांची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत तसेच उक्त योजनेमध्ये अत्यावश्यक कामांना दुर्लक्षीत करण्यासंदर्भातील अधिकाऱ्यांची नावे व त्यांच्यावर कोणती प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित आहे,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन त्यानुसार स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींशी चर्चा न करता अंदाजपत्रक व योजना आखण्यात आल्याबाबत तसेच योजनेतील वास्तव समस्यांकडे दुर्लक्ष केल्याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२७-०४-२०२६) :** (१) सिंहगड किल्ला घेरा ता. हवेली, जि.पुणे सिंहगड पाणीपुरवठा योजना प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत समाविष्ट करुन अंदाजपत्रके व आराखडे प्रशासकीय मंजुरी करीता दिनांक १५/०७/२०२३ रोजी शासनास प्राप्त झाली होती. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदर योजनेस प्रशासकीय मान्यता प्रदान करता आली नाही. सदर योजनेचा समावेश सिंहगड किल्ला विकास आराखडयामध्ये करण्यात आला असून सदरचा आराखडा दिनांक ०१/०५/२०२५ रोजी नियोजन विभागास मंजुरीकरीता सादर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०/०६/२०२५ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीमध्ये सदर योजनेस मान्यता प्राप्त झाली असून सदरचा आराखडा दिनांक १८.०६.२०२५ रोजी शिखर समितीच्या मंजुरीकरिता सादर करण्यात आला आहे.

(२) जलजीवन मिशन कार्यक्रम हा केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत विहित कालावधीमध्ये पूर्ण करण्याचा महत्त्वकांक्षी कार्यक्रम असल्याने अंमलबजावणीमध्ये गती यावी याकरिता शासनाने दिनांक १८/०७/२०२३ च्या पत्रान्वये दिलेल्या परवानगीच्या अधिन राहून दिनांक २२/०७/२०२३ रोजी या पाणी पुरवठा योजनेची निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, सदर योजनेची प्रशासकीय मान्यता न झाल्याने पुढील कार्यवाही करता आली नाही. त्यामुळे निविदा प्रक्रियेतील सुसंगती व प्रक्रियेतील पारदर्शकतेची चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) सदर योजनेसंदर्भात माहिती दिनांक ११/०१/२०२३ रोजीच्या ग्रामसभेमध्ये देऊन ग्रामसभेचा ठराव ही घेण्यात आला आहे.

(४), (५) व (६) सदर योजनेत समाविष्ट करण्यात आलेल्या कामांची यादी व प्राधान्यक्रम यांचा सखोल अभ्यास करुन अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर योजनेतील अंदाजपत्रकात अत्यावश्यक कामांकडे दुर्लक्ष करण्यात आले नाही.

---

**संगमनेर (जि.अहिल्यानगर) जालुक्यातील आरोग्य केद्राचे श्रेणीवर्धन करणेबाबत.**

**(१२) ७७७१ (२३-०९-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगाव दिघे, चंदनापुरी व धांदरफळ खुर्द (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) या गावांची व परिसरातील नागरिकांना तात्काळ उपचार घेण्यासाठी संगमनेर येथे जावे लागत असल्याने या गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणी वर्धन करून ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय उभारण्यास मंजुरी देण्याची मागणी स्थानिक नागरीक, लोकप्रतिनिधनी यांनी मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य, संचालक, रुग्णालये (राज्यस्तर) यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली असून याबाबतचा प्रस्ताव उपसंचालक, आरोग्य विभाग, नाशिक यांचेकडून शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगमनेर येथे सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयासोबत १० खाटांचे ट्रॉमा केअर सेंटर मंजूर असून या ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याचा निर्णय सन २०२२ मध्ये घेण्यात आलेला आहे तथापि १०० खाटांच्या रुग्णालयाऐवजी २०० खाटांचे सामान्य रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याची मागणी स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये मा.मंत्री,सार्वजनिक आरोग्य व संचालक, रुग्णालये- राज्यस्तर, यांच्याकडेलेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२९-०४-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र तळेगांव दिघे, प्राथमिक आरोग्य केंद्र चंदनापूरी आणि प्राथमिक आरोग्य केंद्र धांदरफळ (ता. संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर) या तीन प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत आपल्या दिनांक ०९/०१/२०२५ निवेदनानुसार क्षेत्रीय कार्यालयाकडून प्रस्ताव तपासून प्राप्त झाले आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) सार्वजनिक आरोग्य सेवेच्या पायाभुत सुविधांबाबत नियोजित पध्दतीने कामे करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शासनाने दिनांक २९/०५/२०२५ अन्वये असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, आधीच हाती घेण्यात आलेली बांधकामे पूर्ण करुन त्या-त्या ठिकाणी आरोग्य सेवा तातडीने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. त्यामुळे सद्य:स्थितीत नवीन संस्था मंजुरी व बांधकामे हाती घेण्यात येणार नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात नवीन रोगाच्या साथीचा प्रादुर्भाव झाल्यास करावयाच्य उपाययोजनेबाबत

**(१३) ७७७५ (३०-०७-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एव्हरेस्ट शिखरावरील बर्फ, अंटार्टिका खंड आणि परिसरातील हिमनद्या वेगाने वितळत असल्यामुळे अनेक वर्षांपासून गोठलेल्या अवस्थेत असलेले अनेक जिवाणू आणि विषाणू बाहेर पडून प्राणी अथवा मनुष्याच्या संपर्कात आल्यास जगभरात रोगाच्या नवीन साथी येतील असा धोक्याचा इशारा राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेने दिनांक २२ एप्रिल, २०२५ रोजी व त्या सुमारास दिल्याचे निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती घऊन भविष्यात अशा नवीन रोगाच्या साथीचा प्रादुर्भाव झाल्यास त्याबाबत कोणत्या उपाययोजना करणार वा करण्यात येणार आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२७-०५-२०२६) :** (१) व (२) राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेकडून (NIV) अशा स्वरुपाचा कोणताही इशारा निर्गमित करण्यात आलेला नाही. तथापि, ही शक्यता पूर्णत: नाकारता येत नसली तरी सध्या ती अनुमानात्मक स्वरूपाची असून सांडपाणी निरीक्षणावरील अभ्यासात आजपर्यंत असा कोणताही रोगजंतू (जिवाणू/विषाणू) आढळलेला नाही, असे आयसीएमआर-एनआयव्ही यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कडेगाव( जि. सांगली ) तालुक्यातील आरोग्य केंद्रामधील कर्मचा-यांची रिक्त पदे भरणेबाबत.

**(१४) ७८०४ (१९-०९-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडेगाव( जि. सांगली ) तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्रामधील ५९ कर्मचा-यांची पदे रिक्त असून त्यामध्ये दोन पदे वैदयकीय अधिकारी यांची असून यामुळे वैद्यकीय सेवा देण्यास अडचणी येत असून येथे उपजिल्हा रुग्णालय व ट्रामा केअर सेंटर उभारण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांगी ( ता.कडेगाव) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे काम चार ते पाच वर्षांपूर्वी पूर्ण झाले असून सध्या इमारतीच्या छताला गळती तसेच भिंतीला भेगा पडल्या असून परिसर अस्वच्छ असल्याने रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात झाडे-झुडपे वाढली असून बाहेरील बाजूस शेवाळयुक्त पाणी साठल्याने डेंग्यू, मलेरिया यासारख्या रोगाचा प्रादुर्भाव वाढतआहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (०८-०५-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

एकूण ३१ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी यांचे एकही पद रिक्त नाही

(२) हे अशंत: खरे आहे.

सदरील दुरुस्तीबाबत कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावरुन करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही

वांगी (प्राथमिक आरोग्य) केंद्राच्या परिसरामध्ये वारंवार स्वच्छता केली जाते व परिसरातील झाडे झुडपे तोडली जातात. त्यासोबत बाजूच्या खड्यांमध्ये पाणी साठून राहत असल्यामुळे तेथे डास प्रतिबंधक उपायोजना करणेत आली आहे.

वांगी (प्राथमिक आरोग्य) केंद्र मुख्यालयाच्या परिसरात मागील १ वर्षात डेंगू, मलेरियाचे रुग्ण आढळून आलेले नाही.

(४) लागू नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जलजीवन मिशन अंतर्गत योजनांना सुधारित मान्यता देण्याच्या प्रस्तावाबाबत

**(१५) ७८९६ (१९-०९-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलजीवन मिशनच्या सुमारे १८ हजार योजनांना शासनाने सुधारित मान्यता देण्याच्या निर्णयानुसार माहे एप्रिल, २०२५ पर्यंत सुमारे ६ हजार योजनांना सुधारित मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधारित मान्यता देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर सुधारित मान्यतेमुळे शासनावर किती रक्कमेचा आर्थिक भार पडणार आहे, आतापर्यंत सुधारित मान्यता दिलेल्या योजनांसाठी किती जादा खर्च करावा लागणार आहे,

(४) असल्यास, सुधारित मान्यतेनूसार किती कालावधीत या योजना पुर्ण करण्यात येणार आहेत व उर्वरित सर्व जलजीवन मिशनच्या योजनांना कधी मंजूरी देण्यात येणार आहे ?

**श्री. गुलाबराव पाटील (२४-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अ) वस्तु व सेवा कराच्या (GST) दरामध्ये १२% वरून १८% अशी सुधारणा झाल्यामुळे

आ) कोरोना काळातील असाधारण भाववाढीमुळे जादा दराच्या निविदा स्विकृती करावी लागणे

इ) वाड्या वस्त्याच्या मुळ योजनेत समावेश न केल्याने आता FHTC पुर्ण करण्यासाठी समावेश करणे आवश्यक आहे.

ई) काही योजनांमधील पाण्याचे स्त्रोत कोरडा गेल्यामुळे नवीन स्त्रोत घ्यावे लागलेत, काही योजनांमध्ये उद्भवाची जागा बदलल्यामुळे, व योजनांच्या उपांगांसाठी जागा न मिळाल्यामुळे, ईत्यादी तांत्रिक कारणांमुळे योजनांच्या किमतीत वाढ झाली आहे.

उ) काही योजनांमध्ये विद्यूत जोडणी करीता महावितरणमार्फत देण्यात येणाऱ्या कोटेशनमुळे वाढणारी रक्कम.

ऊ) PWD, रेल्वे, वनविभाग व इतर शासकीय विभागांमार्फत आकारण्यात येणारे शुल्क अथवा अंशदान रक्कम अदा करण्याकरिता वाढीव तरतुद (उदा. जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, भारतीय रेल,एमआयडीसी इत्यादी ) कारणांमुळे योजना सुधारित होत आहेत.

(३) योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता द्यावयाच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने अंदाजे रू.९८४३.४४ कोटी इतक्या अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे.

मार्च, २०२६ पर्यंत एकूण ७७९२ इतक्या सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेल्या योजनांसाठी रू. १५७४.०३ कोटी अतिरीक्त निधी लागणार आहे.

(४) केंद्रिय मंत्रीमंडळाने दिनांक १०/०३/२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार जल जीवन मिशन कार्यक्रमास माहे डिसेंबर, २०२८ पर्यत मुदतवाढ दिली असून संपर्ण देशात जल जीवन मिशन कार्यक्रमाची पुनर्रचना करण्यासाठी एकुण रू ८.६९ लाख कोटी रुपयांपर्यत वाढविण्यास मान्यता दिली आहे, ज्यामध्ये रू.३.५९ लाख कोटी केंद्रीय सहाय्य आहे. या नवीन टप्प्याला "जल जीवन मिशन २.०" असे संबोधण्यात येणार आहे.

---

## परभणी जिल्ह्यातील जलसंधारणाची कामे रद्द करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(१६) ७९२० (१९-०९-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील जलसंधारणाच्या कामांना दोन वेळा मुदतवाढ देऊनही कंत्राटदारांनी कामे पूर्ण न केल्यामुळे कंत्राटदारांच्या उदासीन धोरणामुळे जलसंधारणाची रु. ५ कोटी रुपयांची चार कामे रद्द करण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०२५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे जिल्ह्यातील वाघाळा (पाथरी), आनंदवाडी व दैठणा (परभणी), तसेच अवलगाव (सोनपेठ) या भागातील शेतकरी जलसिंचनाच्या सुविधांपासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन जलसंधारणाची कामे करण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०९-०७-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. सदर कामांना सन २०१९ व २०२१ मध्ये प्रशासकीय मान्यता प्राप्त असून मुख्यत: प्रलंबित भूसंपादन, स्थानिक लोकांचा विरोध, ठेकेदारांचे असहकार्य आणि निधीच्या अभावी कामे अद्यापपर्यंत सुरु नाहीत. सदरहू कामे रद्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) संबंधित कंत्राटदारांना दिनांक १२/०६/२०२३, दिनांक ३१/१२/२०२४ व दिनांक ०३/०१/२०२५ अन्वये सदरहू कामे पूर्ण न झाल्यास दंड आकारण्याबाबत व निविदा अटी व शर्तीनुसार कारवाई करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुडशेला, कोदेपूर, जिवती (ता.जिवती, जि.चंद्रपूर) या लघु सिंचन तलावाची कामे पूर्ण करणेबाबत

**(१७) ८०५० (२४-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुडसेला, कोदेपूर, जिवती (ता.जिवती, जि.चंद्रपूर) या लघु सिंचन तलावाची कामे पूर्ण करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा. जलसंपदा मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२९-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे .

(२) चंद्रपूर जिल्हयातील जिवती तालुक्यातील जिवती क्र. ०२ ल.पा. तलाव व कोदेपूर ल.पा. तलाव चे काम वन जमीन घोषित केल्यामुळे सदर तलावाचे काम बंद करण्यात आलेले आहे. मा. मंत्री (मृद व जलसंधारण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४/०९/२०२४ रोजी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये १) महामंडळ व शासन यांनी प्रशासकीय मान्यता देवूनही दोन वर्षामध्ये सुरु न झालेल्या व कार्यारंभ आदेश दिल्यानंतर व कार्यारंभ आदेशातील मुदतीनुसार सुरु न झालेल्या सर्व कामांना तात्पुरती स्थगिती देणे. २) प्रशासकीय मान्यतेनंतर तीन वर्षाहून अधिक काळ खाजगी अथवा वन जमिन संपादनाअभावी अपूर्ण असलेल्या कामांना स्थगिती देणे व ३) दोन मुदतवाढी अथवा दोन वेळा सुधारीत प्रशासकीय मान्यता देवूनही अपूर्ण असलेल्या कामांना स्थगिती देणे याबाबत बैठक संपन्न झाली असून बैठकीत सदरहू दोन तलाव बांधकामाच्या प्रशासकीय मान्यता रद्द करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच गुडशेला ल.पा. तलावाची प्रशासकीय मान्यता दिनांक २८/१२/२०२१ अन्वये रद्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील गेटेड साठवण बंधारे बांधकामाबाबत

**(१८) ८०६३ (२४-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील गेटेड साठवण बंधारे बांधकामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांना निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१७-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिवती तालुक्यातील गुडशेला, महाराजगुडा, वणी, पुडियाल मोहदा, लालडोह, भारी, राहपल्ली व इतर गावांमध्ये एकूण ३५ गेटेड साठवण बंधारे, २७ गेटेड सिमेंट नाला बंधारे व २७ सिमेंट नाला बंधाऱ्यांची कामे प्रस्तावित आहेत. सदर सर्वेक्षणाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजुरा (जि.चंद्रपूर) मतदारसंघातील अनेक गावांच्या नोंदीत होणाऱ्या गैरसोयीवर उपाययोजना करणेबाबत**

**(१९) ८०७३ (३०-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) मतदारसंघातील अनेक गावांच्या नोंदी एका तालुक्यात आणि त्यांच्या ग्रामपंचायती दुसऱ्या तालुक्यात समाविष्ट असल्याने होणाऱ्या गैरसोयीवर उपाययोजना करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (राजूरा) यांनी मा.प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांना दिनांक १० मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे .

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नवेगाव, हिरापूर, कारगांव, सिंगारपठार, मानोली (खुर्द), बैलमपूर, वरझडी, नोकारी (खुर्द) या गावांची महसूली नोंद एका तालुक्यात आणि त्यांची ग्रामपंचायत दुसऱ्या तालुक्यात असल्याचे नमुद करुन या गावांची योग्य त्या ग्रामपंचायतीशी समायोजन करण्याची मागणी केली आहे. उक्त गावांचे समावेशन ज्या गावांमध्ये करण्याची मागणी आहे, त्या त्या ग्रामपंचायतींनी असे समायोजन करु नये असे ठराव पारीत केले आहेत. सदर गावांना समाविष्ठ करुन घेण्याबाबत त्या त्या गावातील ग्रामस्थांचे समुपदेशन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर येथील एमआयडीसी मध्ये औद्योगिक युनिट्सला वाळू व फ्लाय ॲश उपलब्ध होण्याबाबत**

**(२०) ८०९२ (१९-०९-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर एम.आय.डी.सी. मध्ये वाळू आणि फ्लाय ॲशच्या टंचाईमुळे २०० हून अधिक औद्योगिक युनिट्स संकटात असून आरक्षित फ्लाय ॲश पैकी २० टक्के ॲश या युनिट्सला देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एम.आय.डी.सी. मध्ये औद्योगिक हेतू ऐवजी व्यावसायिक वापरासाठी भूखंडाचे वाटप करण्यात येत असल्यामुळे नवीन उपक्रमांच्या वाढीस अडथळे येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी मा.उद्योग मंत्री यांना दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (११-०५-२०२६) :** (१) सदर बाब महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी संबंधित नाही.

(२) चंद्रपूर औद्योगिक क्षेत्रातील २१४.५७ हे.आर व अति.चंद्रपूर औद्योगिक क्षेत्रातील ७०.२३ हे.आर अशी एकूण २८४.८० हे.आर जागा संपादित करण्यात आलेली असून, आरक्षित करण्यात आलेल्या भूखंडांची

सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| भूखंडाचा प्रकार | आरेखित भूखंड (अ) | वाटप करण्यात आलेले भूखंड (ब) | शिल्लक भूखंड (अ-ब) |
|---|---|---|---|
| औद्योगिक | ४०६ | ३८१ | २५ |
| व्यापारी | २१ | १६ | ५ |
| निवासी | २८ | ८ | २० |
| एकूण | ४५५ | ४०५ | ५० |

म.औ.वि. महामंडळाचा औद्योगिक विकास करण्याचा उद्देश साध्य करण्याकरीता सर्वाधिक औद्योगिक भूखंडांचे वाटप करण्यात आलेले आहे.
(३) व (४) होय, हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक १२/०३/२०२५ रोजीच्या निवेदनातील मुद्दा क्र. १ हा आरक्षितवाळू आणि फ्लाय ॲशच्या टंचाई बाबत असून, सदर बाब ही मऔवि महामंडळाशी संबंधित नाही. तसेच मुद्दा क्र. २ मध्ये चंद्रपूर ताडाळी औद्योगिक क्षेत्रातील रस्त्याच्या दुरावस्थेबाबत आहे. सद्य:स्थितीत चंद्रपूर ताडाळी औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल दुरुस्ती कामाची निविदा काढण्यात आलेली असून, कंत्राटदारास कार्यरंभ आदेश (Work Order) देण्यात आली आहे. सदर काम प्रगतीपथावर आहे. प्रस्तुत निवेदनातील मुद्दा क्र. ३ बाबतची माहिती वरील प्रश्न क्र. २ च्या अनुषंगाने नमूद करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जांबुटके (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत**

**(२१) ८०९६ (१९-०९-२०२५). श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जांबुटके (ता.दिडोंरी, जि.नाशिक) येथे आदिवासी क्लस्टरची घोषणा माहे मे, २०२२ मध्ये झाली असून त्यासाठी शासनाने एकूण ३२.५१ हेक्टर जमीन औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित करुनही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त क्लस्टरमुळे आदिवासी महिला बचत गट तसेच युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार असून त्यात ४ सब क्लस्टरचा अंतर्भाव करण्यात येणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने नाशिकसह नागपूरमध्येही क्लस्टर उभारण्याकरिता शासन निर्णय घेतला आहे काय तसेच क्लस्टर कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०४-२०२६) :** (१) मौजे जांबुटके, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथील ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरची महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम २ खंड (ग) ची अधिसुचना दिनांक ०१/१२/२०२२ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द झालेली असुन एकुण क्षेत्र ३१.५१ हे. आर क्षेत्रामधुन

सुरत-नाशिक (ग्रीनफिल्ड हायवे) रस्त्यासाठी १.९९ हे. आर क्षेत्र संपादित झाल्यामुळे २९.५२ हे. आर क्षेत्र ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी उपलब्ध आहे.

तसेच अपर मुख्य सचिव (महसुल व वन विभाग) यांचे दिनांक ०४/०३/२०२४ रोजीच्या पत्रात नमुद करण्यात आल्यानुसार १९६६ च्या कलम २२ अ मधील तरतुदीनुसार चालु वर्षाच्या शिघ्रसिध्द गणकानुसार प्रचलित भोगाधिकार मुल्य म्हणजेच कब्जेहक्काची अकृषिक दराने संपूर्ण रक्कम आकारुन सदर जमिन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास हस्तांतरीत करण्यास नियमित अटी व शर्तीवर प्रदान करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे असे नमुद केले आहे.

त्याअनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी मऔविम, मुंबई यांनी त्यांचे दिनांक १७/०१/२०२५ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये मौजे जांबुटके येथील ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी प्रस्तावित असलेले २९.५२ हे. आर क्षेत्र म.औ.वि. महामंडळास विनामुल्य व विनाअट हस्तांतर होणेकरीता अपर मुख्य सचिव (महसुल व वन विभाग) यांना विनंती केलेली आहे.

(२) व (३) प्रस्तावित औद्योगिक क्षेत्र हे आदिवासी बहुल भागात असल्याने समन्यासी औद्योगिक विकासाचे महामंडळाचे धोरण, रोजगार निर्मितीला चालना व मागास घटकांना विकासाची संधी उपलब्ध होणार असुन औद्योगिक क्षेत्र विकसित करणे महामंडळाच्या दृष्टीने हितावह आहे.

महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय दिनांक १६/१०/२०२३ नुसार मौजे जांबुटके, ता. दिंडोरी. जि. नाशिक येथील ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टर (आदिवासी औद्योगिक विकास समुह प्रकल्पास शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. तथापी सदर प्रकल्पामध्ये ४ सब क्लस्टारचा अंतर्भाव करणेबाबत शासन निर्णय/आदेश अद्याप पावेतो प्राप्त झालेले नाहीत.

तसेच आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक ०६/०२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मौजे जांबुटके, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे आदिवासी औद्योगिक समुह उभारणे या प्रकल्पाच्या किमतीपैकी एकवेळ (प्रकल्पाच्या सर्व टप्पयांना अनुसरुन) रक्कम रु.५०,०० कोटी इतका निधी प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणुन प्रधान सचिव, उद्योग विभाग यांना अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास मान्यता दिलेली आहे. त्याचप्रमाणे नागपूरमध्ये क्लस्टर उभारण्याबाबत अदयाप निर्णय झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भद्रावती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील निप्पान डेनो प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांची पूर्तता करणेबाबत

**(२२) ८४०७ (१९-०९-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भद्रावती (जि. चंद्रपूर) तालुक्यातील निप्पान डेन्रो प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या मागण्यांबाबत माहे एप्रिल, २०२५ मध्ये आंदोलन व उपोषण पुकारले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना प्रती ऐकरी रूपये १० हजार इतके अनुदान मिळावे, प्रकल्पग्रस्त, कंपनी व एमआयडीसीमध्ये त्रिपक्षीय करार करावा, प्रकल्पग्रस्तांना नोकरीची हमी द्यावी आदी मागण्यांसाठी प्रकल्पग्रस्तांनी हे उपोषण सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांची पूर्तता करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अशंत: खरे आहे.
प्रकल्पग्रस्तांना प्रती एकरी रु.१० हजार इतके सानुग्रह अनुदान मिळावे अशी मागणी नसून, रु.१० लक्ष प्रती एकरी सानुग्रह अनुदान मिळावे अशी मागणी करण्यात आलेली आहे. तसेच नोकरी देण्याबाबत व इतर मागण्यांची पूर्तता करण्याबाबत मागणी करण्यात आलेली आहे.
(३) प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला अदा करण्यात आलेला असून, मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वाढीव मोबदला देखील नियमानुसार अदा करण्यात आलेला आहे.
तथापि, निवेदनात मागणी करण्यात केल्याप्रमाणे सानुग्रह अनुदान म्हणून एकरी रु.१० लक्ष देण्याबाबत म.औ.वि. महामंडळाचे कोणतेही धोरण नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील ग्रामपंचायत सदस्यांना जात पडताळणी प्रमाणपत्रा अभावी अपात्र ठरविल्याबाबत

**(२३) ८५५१ (१९-०८-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील २१५ ग्रामपंचायत सदस्यांना जात पडताळणी प्रमाणपत्रा अभावी अपात्र ठरविण्याचा निर्णय जिल्हाधिकारी परभणी यांनी सन २०२५ मध्ये घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे याबाबत आक्षेप नोंदवला आहे काय व त्याबाबत प्रधान सचिव ग्रामविकास यांना आदेश दिले होते काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०१-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
मा. श्री. राजेश विटेकर, विधानसभा सदस्य यांच्या दिनांक १२/०३/२०२५ च्या पत्रामध्ये तांत्रिक कारणामुळे जात प्रमाणपत्र सादर करु न शकणाऱ्या परभणी जिल्ह्यातील २१५ ग्रामपंचायत सदस्यांवर करण्यात आलेल्या अपात्रतेच्या कारवाईस स्थगिती देणेबाबत मा. मुख्यमंत्री यांना निवेदन सादर केले होते.
(३) सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ०३, दिनांक ३० एप्रिल, २०२५ नुसार ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित सार्वत्रिक किंवा पोट-निवडणूकांमध्ये सदस्यांच्या, सरपंचाच्या, सभासदाच्या, अध्यक्षाच्या आणि सदस्याच्या व सभापतीच्या राखीव जागांवर निवडून आलेल्या व्यक्तींनी वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी बारा महिन्यांनी मुदत वाढविण्यात आली असून सदरहू अध्यादेशाचे दिनांक १० जुलै, २०२५ रोजी सन, २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० नुसार अधिनियमात रुपांतरण झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पाणीपुरवठा योजना मंजूर करणेबाबत

**(२४) ८९२२ (१९-०९-२०२५). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पाणीपुरवठा योजनेकरीता रु.२५० कोटी इतक्या रकमेची योजना मंजूर करुनही ३० गावांतील नागरीकांना पाणी पुरवठा केला जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजना पूर्ण न झाल्याने माहे एप्रिल-मे, २०२५ मध्ये ऐन उन्हाळयात विहिरी कोरडया पडल्याने सदर तालुका पाणी टंचाईग्रस्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजने अंतर्गत कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर मंजूर केलेला रु.२५० कोटी इतक्या रकमेचा निधी उपलब्ध करुन उक्त योजना तात्काळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०५-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही.

मोखाडा तालुक्यासाठी ५८ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना या योजनेस शासनामार्फत रक्कम रू. २५३.७९ कोटी किमतीच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजने अंतर्गत कामे पूर्ण झालेल्या ३२ गावे व ६१ पाडयांना पाण्याचे वितरण होत आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

सन २०२५ च्या उन्हाळयामध्ये मोखाडा तालुक्यात फक्त ४ गावे व ३३ पाडयांना टँकरने पाणी पुरवठा करावा लागलेला होता.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या मोखाडा प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस रू.२५३.७९ कोटी रूपये किंमतीपैकी माहे फेब्रुवारी, २०२६ अखेर रक्कम रू.२२५.९६ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

मोखाडा प्रादेशिक पाणी पुरवठा योजना दोन टप्प्यात राबवली जात असून पहिल्या टप्प्यातील उंच जलकुंभापर्यंतची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहेत. तसेच दुसऱ्या टप्प्यातील वितरण व्यवस्था व नळ जोडणीची कामे जिल्हा परिषद, पालघर मार्फत राबविण्यात येत आहेत. योजनेत समाविष्ठ एकूण ९५ उंच साठवण टाक्यापैकी ९२ उंच साठवण टाक्याची कामे पूर्ण करण्यात आलेली असून उर्वीरत ३ उंच साठवण टाक्यांपैकी २ उंच टाक्यांचे काम प्रगतीत आहे. उर्वीरत उंच जलकुंभातून वितरण व्यवस्था व नळ जोडणीची कामे पूर्ण होताच तालुक्यातील सर्व गावांना १००% पाणी पुरवठा कार्यान्वीत करण्याचे उदिष्ट ठेवण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भद्रावती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(२५) ९११६ (१९-०९-२०२५). श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा गवराळा, चिरादेवी, ढोरवासा, तेलवासा, पिपरी, चारगाव, विजासन (भद्रावती) लोणार रिठ, रुयाळ रिठ (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील शेतजमिनी निपोन डेन्ड्रो (सेंट्रल पॉवर इंडिया कंपनी) प्रकल्पाकरीता सन १९९४ मध्ये अधिग्रहीत करण्यात आलेल्या होत्या परंतू सदर संपादित शेतजमिनीवर ३० वर्ष होऊनही निपोन डेन्ड्रो कंपनी मार्फत प्रकल्प सुरु करण्यात आला नसल्याने शासनाने सदर शेतजमिन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) कडे हस्तातरीत केल्यापासून सदर शेतजमिन पडीत अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत निपोन डेन्ड्रो कंपनीकरीता संपादीत करण्यात आलेली शेतजमीन ही तेव्हा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) कडून ग्रेटा एनर्जी व न्यू ईरा किलटेक या दोन कंपनीकरिता हस्तांतरीत करण्यात आली व सदर ठिकाणी दोन्ही कंपन्यांनी काम सुरु केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या वेळेस शेतजमिनी शेतकऱ्यांकडून निपोन डॅन्ड्रो प्रकल्पाकरिता संपादित केल्या होत्या परंतू प्रकल्प सुरु न झाल्याने त्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी शासनाकडून अल्प दराने संपादित केल्या होत्या परंतू आता ३० वर्षानंतर जमिनी संपादित केल्या असत्या तर शेतकऱ्यांना आजच्या दराने शेतजमिनीचा शासन मोबदला मिळाला असता, तसेच प्रकल्प सुरु न झाल्याने प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या ही मिळाल्या नाही त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे त्यांनी आता सुरु होत असलेल्या कंपनीकडून किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) कडून सानुग्रह अनुदान म्हणून एकरी रु. १० लक्ष इतके रुपये मिळण्याबाबत तसेच प्रत्येकाला नौकरी देण्याबाबत व इतर मागण्या पूर्ण करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना आपला अहवाल पाठविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (वरोरा) यांनी मा.प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, चंद्रपूर यांना दिनांक १२ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुसार उक्त शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (११-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही.

भद्रावती (मोठे) औद्योगिक क्षेत्र येथे एकूण ४ भूखंडाचे आरेखन करण्यात आले असून भूखंडाचे वाटप खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

१. मे. ग्रेटा एनर्जी लि., बी-१ क्षेत्र ४३ हे.आर. व बी-४ ८.८० हे.आर.

२. मे. सेंट्रल इंडीया पॉवर कंपनी लि., बी-२, क्षेत्र ५०० हे.आर

३. मे. न्यु ईरा क्लिनटेक सोल्युशन्स प्रा.लि., बी-३ क्षेत्र ६३७ हे.आर.

वरीलपैकी मे. ग्रेटा एनर्जी लि., व मे. न्यु ईरा क्लिनटेक सोल्युशन्स प्रा.लि. या कंपनीस भूखंडाचा आगावू ताबा देण्यात आला असून, प्राथमिक करारनामा कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू आहे. कंपन्यांनी सुरक्षा भिंत व इतर कामे सुरू केलेली आहेत. मे. सिपको यांचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे भूखंड अद्याप मोकळा आहे.

(२) हे खरे आहे.

सदर कंपन्यांनी भूखंडावर सुरक्षा भिंतीचे काम सुरू केले आहे.

(३) हे खरे नाही.

भद्रावती (मोठे) औद्योगिक क्षेत्रातील भूसंपादन करतेवेळी शेतजमिनीचा तत्कालीन दरानुसार मोबदला संबंधीत भूधारकास अदा करण्यात आलेला होता. तसेच न्यायालयीन आदेशानुसार वाढीव मोबदला सुध्दा वेळोवेळी देण्यात आलेला आहे. तसेच मे.ग्रेटा एनर्जी लि. व मे. न्यु ईरा क्लिनटेक प्रा.लि. यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिनांक ०५/०२/२०२५ रोजीचे पत्रान्वये प्रती ७/१२ एकनोकरी योग्यतेनुसार देण्यात येईल, असे पत्रामध्ये नमुद केलेले आहे.

(४), (५) व (६) हे खरे आहे.

दिनांक १२/०५/२०२५ रोजी प्राप्त निवेदनामध्ये सानुग्रह अनुदान म्हणून एकरी रु.१० लक्ष व इतर मागण्या पूर्ण करण्याबाबत विनंती केली आहे. परंतु शेतकऱ्यांना नियमानुसार भूसंपादनाचा मोबदला व मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वाढीव मोबदला अदा केला असून मागणी केल्याप्रमाणे एकरी रु.१० लक्ष देण्याचे महामंडळाचे धोरण नाही. तसेच विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषद, बीड यांनी जलदिन निमित्त आयोजित स्पर्धेत बक्षिस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसाची रक्कम न दिल्याबाबत

**(२६) ९२३९ (१९-०९-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद बीड यांनी जागतिक जलदिन निमित्त दिनांक २२ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास बलभिल महाविद्यालय, बीड येथे वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येवून स्पर्धेत बक्षिस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना अद्यापी बक्षिसाची रक्कम दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने बक्षिस पात्र विद्यार्थ्यांना बक्षिस रक्कम न दिल्याबाबत संबंधीत दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०२-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जलजीवन मिशन अंतर्गत जागतिक जलदिनानिमित्ताने बलभीम महाविद्यालय बीड येथे वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कनिष्ठ महाविद्यालयीन स्पर्धेत तीन विद्यार्थी बक्षीस पात्र ठरले होते तर वरिष्ठ महाविद्यालय स्पर्धेत तीन विद्यार्थी बक्षीस पात्र ठरले होते. त्याप्रमाणे संबंधित विद्यार्थ्यांचे बँक खाते नंबर प्राप्त करून घेतले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खातेवर पी. एफ. एम. एस. या प्रणालीने पैसे वितरित करण्याची कारवाई करण्यात आली होती. परंतु दिनांक ३१ मार्च, २०२४ रोजी तांत्रिक कारणामुळे संबंधित विद्यार्थ्यांच्या खात्यावर निधी वितरित झाला नाही. तद्नंतरच्या कालावधीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचेकडून सदर निधीकरिता राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर कार्यालयाकडे निधी मागणी करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने सदर स्पर्धेतील स्पर्धकांच्या बक्षीसाची रक्कम रु, २,२५,०००/- इतका निधी वर्ग करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिराळा व वाळवा (जि.सांगली) तालुक्यातील काही पाझर तलावांचे साठवण तलावात रुपांतर करत असताना अतिरिक्त खर्च करण्यात आल्याबाबत

**(२७) ९२९२ (१९-०९-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा व वाळवा (जि.सांगली) तालुक्यातील अनेक ठिकाणी पाझर तलाव असून त्यातील काही पाझर तलावांचे साठवण तलावात रुपांतर करत असताना सदरहू तलावांच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता रु.६ कोटी इतकी देण्यात आली असताना प्रत्यक्षात ते काम पूर्ण करण्याकरीता सुप्रमा (सुधारीत प्रशासकीय मान्यता) रु. २० कोटी रुपयांपर्यतचा वाढीव निधी मंजूर करुन खर्च करण्यात आल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाझर तलावांचे काम हे पूर्णपणे जिल्हापरिषदेच्या अधिपत्याखाली असल्याने त्याबाबतची वाढीव सुप्रमा घेत असताना त्याबाबत जिल्हापरिषद, महामंडळ, जलसंपदा तसेच पाणी नियमन यांच्याकडून परवानगी घेण्यात आली होती काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच उक्त पाझर तलावांचे साठवण तलावात रुपांतर करत असताना वाढीव सुप्रमा घेत असताना वित्त विभागाशी समन्वय साधण्यात आला होता काय, असल्यास त्यानुसार दोन्ही तालुक्यातील आतापर्यंत किती तलावांच्या कामांना सुप्रमा देण्यात आल्या आहेत, त्याचप्रमाणे तलावांच्या कामांच्य रक्कमेत वाढ होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त साठवण तलावामुळे त्याठिकाणच्या सिंचन क्षेत्रात किती प्रमाणात वाढ झाली, मूळ पाझर तलावाच्या जलस्रोतांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे काय, तसेच, या बदलामुळे तलावाच्या खालील क्षेत्राला पाणी मिळणे दुरापास्त होणार असल्याने पाण्याचे योग्य ते नियोजन होण्याकरीता कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदनुसार उक्त ठिकाणचे पाझर तलावांचे साठवण तलावात रुपांतर करणे, सिंचन क्षेत्रात वाढ, पाणी टंचाई कायमस्वरुपी मिटविणेबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०९-०७-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

शिराळा व वाळवा तालुक्यामध्ये एकूण ०६ पाझर तलावांचे रुपांतरीत साठवण तलावामध्ये रुपांतर केले आहे. त्यापैकी फक्त वाटेगांव रुपांतरीत साठवण तलाव या एका योजनेला सन २०२४ मध्ये रु. २०.८३ कोटी रकमेची सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, शिराळा व वाळवा तालुक्यातील ६ योजनांपैकी फक्त एकाच योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर योजनेच्या कामात कठीण स्तर खोदकाम, गाभा, कवच, भरावा, गाऊंटींग इत्यादी बाबीमुळे वाढ झाली आहे.

(४) वाटेगांव रुपांतरीत साठवण तलाव योजनेची पूर्वीच्या साठवण क्षमता ५३८ स.घ.मी. व सिंचन क्षेत्र ९९ हे. होते परंतू सदर तलावाचे रुपांतरीत साठवण तलाव केल्यामुळे प्रत्यक्ष पाणीसाठा १०७०.२४ स.घ.मी व सिंचन क्षेत्र १४६ हे. झाले असल्यामुळे पाणीसाठा व लाभक्षेत्रात वाढ झाली आहे.

(५) सदर ६ पाझर तलावांचे रुपांतरीत साठवण तलाव केल्यामुळे प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर पाणीसाठा २९५२.८३ सघमी. व सिंचन क्षेत्र ५१४ हेक्टर झाले असून पाणीसाठा व लाभक्षेत्रामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात सांस्कृतिक भवनासाठी तसेच विविध समाजाच्या संस्था व संघटनांना भूखंडाचे वाटप करणेबाबत**

**(२८) ९३२९ (१९-०९-२०२५). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील ५०० चौ.मी. जागा सांस्कृतिक भवनासाठी तसेच रत्नागिरी आणि दापोली औद्योगिक पट्ट्यात विविध १२ समाजाच्या संघटनासाठी प्रत्येकी ३०० चौ. मी. क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप करण्यात आल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक क्षेत्रात विविध समाज संस्था संघटनांना सामाजिक भूखंड वाटप करण्याचे धोरण नसल्याचे स्पष्ट अभिप्राय एम.आय.डी.सी प्रशासनाने दिले असतांनाही माहे जुलै,२०२४ व माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये एम.आय.डी.सी मध्ये झालेल्या बैठकीत मा.उद्योग मंत्री यांच्या सूचनेनुसार ठरावास मान्यता देण्यात येऊन शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्याचे निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विविध सामाजिक संस्थांना औद्योगिक क्षेत्रातील भूखंड नाममात्र दराने देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने औद्योगिक भूखंड वाटप झालेल्या समाज भवनांसाठी शासनाने कोणत्या सुधारणा केल्या तसेच विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची व्यवस्था करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०५-२०२६) :** (१) हे अशंत: खरे आहे.

(२), (३) व (४) रत्नागिरी (मिरजोळे) औद्योगिक क्षेत्रासाठी विविध समाजातील व्यक्तींच्या जमिनी संपादन करण्यात आल्या असल्याने अशा समाजातील व्यक्तींना एकत्र बसून युवकांचे प्रश्न, महिलांच्या समस्या सोडविणे, सर्व समाज बांधव एकत्र येऊन त्या समाजाच्या व्यक्तींच्या स्वतंत्र व्यवसायाच्या दृष्टीने एकत्रित चर्चा व्यवस्थापन, कार्यालय, युवकांना तांत्रिक प्रशिक्षण देणे इत्यादी कामांसाठी अशा सामाजिक संस्थांना समाज भवन उभारण्याकरीता सुमारे ३०० ते ५०० चौ.मी. पर्यंतचे भूखंड ठेवण्याचे आणि सदर जागा सवलतीच्या दराने वाटप करण्याची मागणी होती.

महाराष्ट्र ओद्योगिक क्षेत्राकरीता विविध समाजप्रवर्गातील व्यक्तींच्या जमिनी संपादित करण्यात आलेल्या आहेत, अशा समाजासाठी सामाजिक बांधीलकी या नात्यातून मऔवि महामंडळाच्या संचालक मंडळाच्या मंजूरीने भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आटपाडी (जि.सांगली) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(२९) ९४१९ (१९-०९-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी (जि.सांगली) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये मृत व्यक्तीचे शवविच्छेदन करण्यासाठी आलेल्या

सर्वसामान्यांची आर्थिक लूट होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयांमध्ये आलेल्या रुग्णांची डॉक्टरांकडून योग्यप्रकारे चिकित्सा न करता जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत तात्काळ चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याचे लेखी निवेदन तहसिलदार, आटपाडी यांना तसेच रुग्णालयातील गैरकारभाराबाबत लेखी निवेदन जिल्हाधिकारी यांना माहे एप्रिल, २०२५ मध्ये दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२३-०६-२०२६) :** (१) हे निदर्शनास आले नाही.

आटपाडी (जि.सांगली) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये शवविच्छेदन करणेकरिता मोठया प्रमाणात आर्थिक लूट व डॉक्टरांकडून रुग्णांची योग्य प्रकारे चिकित्सा न करता जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन हेळसांड होत असल्याबाबतची तक्रार श्री. राजेंद्र (बापू) खरात, जिल्हाध्यक्ष, सांगली, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) यांच्या दिनांक १७/०४/२०२५ दिनांक ०५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, आटपाडी यांचेकडे करण्यात आली होती. तथापि, ग्रामीण रुग्णालय, आटपाडी येथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेकडून करण्यात येणा-या शवविच्छेदन व आरोग्य सुविधांच्या संबधी कोणत्याही प्रकारची तक्रार नाही अशा स्वरुपाचे पत्र श्री. राजेंद्र (बापू) खरात, जिल्हाध्यक्ष, सांगली, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) दिनांक ०८/०५/२०२५ रोजी वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, आटपाडी यांना देण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील चाकण एमआयडीसी परिसर तसेच नाशिक येथील सातपूर व अंबड परिसरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(३०) ९६११ (१९-०९-२०२५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील ऑटोमोबाईल हब म्हणून ओळख असणाऱ्या चाकण एमआयडीसी परिसर तसेच नाशिक येथील सातपूर व अंबड येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरेगाव बुद्रुक ते किवळे दरम्यानचा ६ किलोमीटर रस्त्यावर सर्वत्र खड्डे पडले असून कडूस ते आंबेठाण हा सुमारे २५ किलोमीटरचा औद्योगिक वसाहतीस जोडणाऱ्या महामार्गाचीही दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन चाकण तसेच नाशिक येथील सातपूर व अंबड एमआयडीसी मधील सर्व रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०४-२०२६) :** (१) म.औ.वि. महामंडळाच्या अखत्यारीत असलेल्या चाकण औद्योगिक

क्षेत्रामधील टप्पा क्र.१ ते ४ मध्ये पायाभूत सुविधातंर्गत अनुक्रमे ७.२५,७२.४२,२२.८१ व १३.४६ कि.मी. या प्रमाणे एकूण ११५.९४ कि.मी.लांबीचे रस्ते विकसित करण्यात आले असून, टप्पा क्र. ५ मधील रस्त्यांच्या विकासकामांसाठी निविदा पक्रिया सुरु आहे.

तसेच नाशिक येथील सातपुर व अंबड औद्योगिक क्षेत्रातील रस्ते सन १९७८ ते १९९७ च्या दरम्यान टप्प्याटप्प्याने नाशिक महानगरपालिकेस देखभाल व दुरुस्तीकरीता हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदर रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती नाशिक महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

(२) व (३) १) कोरेगाव बुद्रुक ते किवळे हा रस्ता म.औ.वि. महामंडळाच्या चाकण औद्योगिक क्षेत्राबाहेरील आहे. सदर रस्ता म.औ.वि. महामंडळाच्या अखत्यारीत येत नाही.

२) कडूस ते आंबेठाण या २५ कि.मी. रस्त्यापैकी २ कि.मी. चा रस्ता चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ च्या हद्दीलगत असून, मऔवि महामंडळाच्या भूखंड धारकांकरीता पोहोच रस्ता असल्याने सदर रस्त्याचे अस्तरीकरण करण्यात आले आहे.

म.औ.वि.महामंडळाच्या अखत्यारीतील औद्योगिक क्षेत्रातील रस्ते सुस्थितीत असून, सदर रस्त्यांची वेळोवेळी दुरुस्ती केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी व शासकीय कामात कृत्रिम बुद्धिमत्ता (ए आय) तंत्रज्ञानाचा वापर झाल्याने इतर क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये घट होत असल्याबाबत

**(३१) ९७७४ (३०-०७-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी व शासकीय कामात मोठया प्रमाणात कृत्रिम बुद्धिमत्ता (ए आय) तंत्रज्ञानाचा वापर होत असल्याने इतर सर्व क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये घट होत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात राबविण्यात येणाऱ्या स्टार्टअप कंपन्यांमध्ये संरचनात्मक बदल वेगाने घडत असल्याने राज्यात कार्यरत असणाऱ्या झोमॅटो, कार्स २४ आणि गुपशप, स्विगी आणि फ्लिपकार्ट यासारख्या नामांकित कंपन्यांनी कर्मचाऱ्यांमध्ये कपात करणे सुरू केले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उद्योग विभाग आणि माहिती तंत्रज्ञान विभागाने यासाठी संयुक्त बैठक घेऊन सदरहू तंत्रज्ञानामुळे नोकऱ्यांमध्ये कपात न करता पूर्वीचे सर्व शासकीय व खाजगी स्टार्टअप मधील पदे सुरक्षित ठेवणेबाबत कोणती धोरणे ठरविली आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन त्यानुसार सदर तंत्रज्ञानामुळे नोकऱ्यांमध्ये कपात न करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०६-२०२६) :** (१) माहिती तंत्रज्ञान (IT) व सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये कृत्रिम बुध्दीमत्ता (AI) व ऑटोमेशनचा वापर वाढत असल्याचे सर्वसाधारणपणे पाहण्यात येत आहे. या बदलाचा राज्यातील खाजगी व शासकीय कामात मोठया प्रमाणात कृत्रिम बुद्धिमत्ता (ए आय) तंत्रज्ञानाचा वापर होत असल्याने इतर सर्व क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात परिणाम झाल्याचा कोणताही अधिकृत अहवाल/ अभ्यास दस्तावेज उद्योग संचालनालयाकडे प्राप्त झालेला नाही.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एकूण रोजगारातील परिवर्तनास एआय/ऑटोमेशन हे एकमेव कारण नसून जागतिक आर्थिक परिस्थिती व तंत्रज्ञानातील बदल, खर्च नियंत्रण इत्यादी बाबी कारणीभूत आहेत. कृत्रिम बुध्दीमत्ता व ऑटोमेशनमुळे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात उच्च कौशल्यधारीत नवीन रोजगार संधी देखील निर्माण होत आहेत.

(२) सदर बाबत कोणताही अधिकृत अहवाल प्राप्त नसल्यामुळे राज्य शासनाने स्वतंत्र अध्ययन केले नाही.

(३) आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), मशीन लर्निंग (ML), ऑटोमेशन, क्लाऊड कंप्युटींग, सायबर सुरक्षा, बीग डेटा इत्यादी उदयोन्मुख तंत्रज्ञानामुळे रोजगाराचे स्वरूप बदलत असून, या परिस्थितीत राज्य शासनाद्वारे कौशल्य विकास, उच्च कुशल रोजगार निर्मिती व उद्योग-शिक्षण संस्था साखळी मजबूत करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

राज्य शासनाने, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०२३ जाहीर केले असून या धोरणांतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, मशीन लर्निंग, ब्लॉक-चेन, इ. यावर आधारित उदयोन्मुख तंत्रज्ञान उद्योगांना विशेष प्रोत्साहने लागू करण्यात आली आहेत. यामध्ये भांडवली अनुदान, वीज दर अनुदान, माहिती तंत्रज्ञान उद्यानातील घटकांना मुद्रांक शुल्क माफी, प्रमाणपत्र सहाय्य तसेच रोजगार निर्मितीला चालना देणेकरिता भरती सहाय्य इ. प्रोत्साहनांचा समावेश आहे.

उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील स्टार्ट-अप्स घटकांना सक्षमित करुन त्याद्वारे रोजगार निर्मितीच्या उद्देशाने "एम हब" हे राज्यस्तरिय उत्कृष्टता केंद्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे कळंबोली येथे विकसित केले जात आहे. उच्च कुशल रोजगार निर्मितीला चालना देण्याकरिता "एम हब" अंतर्गत नोंदणीकृत घटकांकरिता कौशल्य विकास सहाय्य अनुज्ञेय करण्यात आले आहे.

तसेच राज्य शासनाने ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस्, गेमिग, कॉमिक्स, एक्सटेंडेड रियालिटी (AVGC-XR) धोरण २०२५ दिनांक ३/११/२०२५ अन्वये जाहीर केले असून याअंतर्गत कौशल्य, कौशल्यवर्धन आणि उद्योजकतेला प्रोत्साहने देऊन ५ लाख रोजगाराच्या संधी (प्रत्यक्ष + अप्रत्यक्ष) निर्माण करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. राज्य महामंडळांसाठी एव्हीजीसी आधारित अभ्यासक्रमांचा विकास करण्याकरिता समर्पित कौशल्य सल्लागार समितीची स्थापना, ट्रेन-द-ट्रेनर कार्यक्रम, व्यावसायिक प्रशिक्षण, इंटर्नशिप आणि अप्रेंटिसशिपद्वारे कौशल्य विकासाला प्रोत्साहन देय करण्यात आले आहे.

राज्य शासनाने जागतिक क्षमता केंद्र धोरण २०२५ दिनांक ०३/११/२०२५ अन्वये जाहीर केले असून उद्योग-आधारित अभ्यासक्रम एकत्रित करून, अत्याधुनिक संशोधन आणि प्रगत डिजिटल तसेच तांत्रिक कौशल्य विकासाच्या माध्यमातून ४,००,००० उच्च-कुशल नोकऱ्या निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. प्रतिभा संपादन आणि कार्यबल सक्षमीकरणाकरिता विद्यापीठ भागीदारी, नियोक्त्याद्वारे प्रशिक्षण, अप्रेंटिसशिप आणि इंटर्नशिप, कार्यरत व्यावसायिकांना एआय, क्लाउड कॉम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा ॲनालिटिक्स आणि ऑटोमेशन यासारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये प्रगत कौशल्ये संपादनासाठी 'कमवा व शिका' अपस्किलिंग कार्यक्रम, इ. संबंधित संस्था/विभागांच्या सहकार्याने राबविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आरोग्य विभागातील ‘गट ब’ मधील ८०० वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदोन्नती प्रलंबित असल्याबाबत**

**(३२) ९९१७ (२५-०९-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य विभागातील विविध कार्यालयांमध्ये जवळपास १२५० वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून या सर्वांना शासकीय नियमानुसार नियुक्तीनंतर ३ वर्षांनी पदोन्नती मिळणे गरजेचे असतानाही ‘गट ब’ मधील जवळपास ८०० वैद्यकीय अधिकाऱ्यांनी नियमानुसार आवश्यक सेवा पूर्ण केली असताही त्यांची पदोन्नती अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या अधिका-यांच्या कामावर आणि त्यांच्या मनोबलावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यातील अनेक अधिकारी हे पदोन्नतीशिवायच निवृत्त झाले असून त्यांचे मोठयाप्रमाणान नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीची प्रक्रिया वेळेवर आणि सुरळीत पार पाडण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (०८-०५-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

तथापि, सदर सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी यांना सेवानिवृत्ती पुर्वी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शासन नियमाप्रमाणे लागु आहेत. तसेच त्यांना जिल्हा तांत्रिक संवर्गाप्रमाणे गट-अ पदाचे लाभ मिळणेबाबत कार्यवाही सुरू आहे. गट-ब वैद्यकीय अधिका-यांचे शासन अधिसुचना ११/०१/२०१९ नुसार दिनांक १८,१९,२० माहे जुलै, २०१९ रोजीच्या विविध शासन आदेशान्वये वैद्यकीय अधिकारी गट-ब या पदावर एकवेळाचे समावेशन झालेले आहे. त्यांची वैद्यकीय अधिकारी गट-ब या पदावर माहे आक्टोबर, २०२५ पर्यंत ६ वर्ष ३ महिने ऐवढी सेवा झालेली आहे.

(४) वैद्यकीय अधिकारी गट-ब यांना गट-अ या संवर्गात शासन नियमानुसार पदोन्नतीच्या कोट्यातील २१९ रिक्त पदावर पदोन्नती देण्याकरीता दिनांक ०८/०४/२०२५ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक संपन्न झाली असून पात्र १९१ उमेदवारांना पदोन्नती देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## चाकण (जि.पुणे) औद्योगिक टप्पा क्रमांक ५ अंतर्गत येणाऱ्या समस्यांबाबत

**(३३) १०२६५ (३०-०७-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) औद्योगिक टप्पा क्रमांक ५ मधील रस्ता वाकी खुर्द पुणे नाशिक महामार्ग येथे जोडण्यात येत असून याच रस्त्यावर पुणे भामा नदी पुलावरुन नदीच्या बाजूने संतोषनगर, वाकी बुद्रुक व काळूस येथे पुढे जाणारा खेड औद्योगिक रस्ता क्रमांक १ ला अंदाजे ५.कि.मी. लांबीचा प्रस्तावित करुन अवघड वाहतूक सुरळीत करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(२) चाकण औद्योगिक टप्पा क्रमांक ५ अंतर्गत येणाऱ्या चाकण नगरपरिषद व वाकी खुर्द या गावांचे प्रस्तावित संपादन रद्द करण्याची कार्यवाही सुरू असून सदर संपादन रद्द करताना आवश्यक पायाभूत सुविधा विकास करण्यासाठी रस्ता क्षेत्र संपादन व नियोजन करण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत चाकण औद्योगिक क्षेत्र वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी टप्पा क्रमांक ५ चाकण व वाकी खुर्द या हद्दीत प्रस्तावित संपादन रद्द करताना त्यापैकी काही क्षेत्र कायमस्वरूपी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी संपादन करून सदर रस्ते तातडीने विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, संबंधीत शेतकरी यांना औद्योगिक महामंडळ यांचे मार्फत क्षेत्र विकास नको असेल तर सदर ठिकाणी औद्योगिक नगररचना योजना करून उद्योग, लॉजेस्टिक, वाणिज्य आणि रहिवासी अशी संयुक्त नगररचना योजना करण्याबाबत तसेच या भागाचा नियोजन बध्द विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०४-२०२६) :** (१) म.औ.वि. महामंडळाच्या चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्रमांक ५ मधील मुख्य रस्त्याची एकुण लांबी ६.८५ कि.मी. असुन यापैकी २.४५ कि.मी. रस्त्याचे काम पुर्ण झाले आहे व उर्वरित ४.४० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या कामासाठी कार्यारंभ आदेश दिनांक १३/११/२०२५ पासून देण्यात आले असुन माहे नोव्हेंबर, २०२७ पर्यंत काम पुर्ण होणे अपेक्षित आहे.

भामा नदी पुलावरुन नदीच्या बाजुने संतोषनगर, वाकी बुद्रुक व काळूस येथे पुढे जाणारा खेड औद्योगिक रस्ता म.औ.वि. महामंडळाच्या हद्दी बाहेरील आहे.

(२) म.औ.वि. महामंडळाच्या चाकण टप्पा क्रमांक ५ औद्योगिक क्षेत्रा मधील मुख्य रस्त्याचे बांधकाम चालू करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. सदर रस्ता चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ पासुन सुरु होऊन, पुणे नाशिक रा.मा.क्र. ६० पासुन बिरदवडी मार्गे आंबेठाणला जाण्याऱ्या रस्त्याला मिळणार आहे.

(३) चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.५ करीता मौजे आंबेठाण, रोहकल, गोनवडी, बिरदवडी, वाकीखुर्द व चाकण या गावातील कलम ३२ (१) अन्वये अधिसूचित करण्यात आलेले क्षेत्र ६९३.९९ हे. आर आहे. सदर गावांपैकी मौजे चाकण व मौजे वाकीखुर्द येथील १४२.०१ हे. आर क्षेत्राची भूसंपादनाची कार्यवाही शेतकऱ्यांच्या विरोधामुळे प्रलंबित ठेवण्यात आलेली आहे.

मौजे चाकण व वाकीखुर्द येथील क्षेत्र संपादनातून वगळणेकरीता प्रस्तावित केले असल्यामुळे तसेच म.औ.वि.महामंडळाच्या संपादनाच्या हद्दीबाहेर असल्याने रस्ते किंवा इतर नियोजन करणे म.औ.वि.महांडळाच्या अखत्यारीत येत नाही.

(४) चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. ५ मध्ये संपादनातील गावापैकी मौजे चाकण व वाकीखुर्द येथील अधिसूचित क्षेत्र म.औ.वि.महांडळाच्या नियोजनात येत नाही तसेच सदरचे क्षेत्र वगळण्यासाठी प्रस्तावित करण्यात

आलेले आहे. तसेच म.औ.वि.महामंडळाच्या संपादनातील क्षेत्रामध्ये रस्त्याचे आरेखन करुन औद्योगिक तसेच इतर वापराकरीता रस्ते सोडण्यात आलेले आहेत. सदर रस्त्यांचे काम प्रगतीपथावर आहे.

सदरचे क्षेत्र संपादनातून वगळण्याकरीता प्रस्तावित करण्यात आल्यामुळे प्रस्तुत क्षेत्राचा उपयोग उद्योग, लॉजिस्टिक, वाणिज्य आणि रहीवासी यासाठी करण्याबाबतची बाब विविध विकास प्राधिकरणांशी निगडीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे उत्रोली-वडगाव (ता.भोर, जि.पुणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत प्रकल्पास मंजूरी देणेबाबत**

**(३४) १०७८७ (१९-०९-२०२५). श्री.शंकर मांडेकर (भोर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उत्रोली-वडगाव (ता.भोर, जि.पुणे) या दुर्गम गावांमध्ये व परिसरात उद्योगांसाठी औद्योगिक विकास महामंडळामार्फत (एमआयडीसी) सन १९९२ मध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करुनही अद्यापही तेथे एमआयडीसी प्रकल्पास मंजूरी प्राप्त नसल्याने उद्योगांना जमिनी वितरीत केल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक नागरीक/लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे वारंवार लेखी मागणी करुनही अद्यापही एमआयडीसी प्रकल्पास मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर भाग हा डोंगराळ असून तेथील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध न झाल्याने नागरीकांचा आर्थिक स्तर खालावलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त भागातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०४-२०२६) :** (१) भोर औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरीता मौजे उत्रोली येथील १२६.८४ हे.आर व मौजे वडगांव डाळ येथील ८४.४९ हे. आर असे एकूण २११.३३ हे.आर खाजगी क्षेत्र व सरकारी २.०० हे.आर क्षेत्र असे एकुण २१३.३३ हे. आर क्षेत्रास मऔवि अधिनियम, १९६१ अन्वये प्रकरण ६ ची अधिसूचना दिनांक २१/१०/१९९२ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार कलम ३२(२) ची अधिसूचना दिनांक ०१/४/१९९३ रोजी प्रसिद्ध केलेली आहे.

त्यानंतर संबंधित खातेदारांना व्यक्तिगत भूसंपादनाच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या होत्या. परंतु, प्रस्तुत भूसंपादन कामी ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात विरोध केल्यामुळे संयुक्त मोजणीचे काम बंद करण्यात आले होते. त्यामुळे प्रकरणी अद्यापपर्यंत पुढील भूसंपादन कार्यवाही झालेली नाही.

(२), (३) व (४) भोर औद्योगिक क्षेत्रातील मौजे उत्रोली व मौजे वडगांव डाळ येथील क्षेत्रास संबंधित खातेदारांचा विरोध असल्याने व संमती असलेल्या क्षेत्रास सलगता नसल्याने सदर क्षेत्र विनाअधिसूचित करण्याकरिता म.औ.वि. महामंडळाच्या प्रस्तावावर महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील तरतुदींच्या अनुषंगाने उपरोक्त क्षेत्र विनाअधिसुचित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

दरम्यान, दिनांक १६/०७/२०२५ रोजी तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री महोदय (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे भोर औद्योगिक क्षेत्राच्या भूसंपादनाबाबत उत्रोली- वडगाव (ता. भोर, जि. पुणे) येथे प्रस्तावित MIDC प्रकल्पास मंजूरी देणेबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये

"भोर तालुक्यातील उत्रोली- वडगाव डाळ येथे प्रस्तावित MIDC चे क्षेत्र भूसंपादन करण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांची सहमती घेण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या स्तरावर प्रयत्न करावेत" असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, भोर, पुणे व प्रादेशिक अधिकारी (२) म.औ.वि.महामंडळ, पुणे यांनी दिनांक ०९/१०/२०२५ रोजी सदर प्रकरणी बैठक घेऊन बाधित शेतकऱ्यांची संमती असल्यास त्याबाबत लेखी संमती देण्यास शेतकऱ्यांना कळविले आहे. सदर बैठकीवेळी उपस्थित बाधित खातेदारांनी भूसंपादनास तीव्र विरोध दर्शविला आहे.

या प्रकरणी शेतकऱ्यांची संपादनाबाबत सहमती प्राप्त झाल्यास भुसंपादनाच्या पुढील कार्यवाहीची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील रक्तपेढ्यांचे बळकटीकरण करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(३५) १०९२५ (३०-०७-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व रक्तपेढ्या अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक रक्त पेढीतील उपलब्ध मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्री, कार्यपद्धती, रक्तासाठी आकारण्यात येणारे शुल्क याची तपासणी करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल,२०२५ मध्ये घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार राज्य रक्त संक्रमण परिषदेने सर्व जिल्हा रक्त संक्रमण अधिकाऱ्यांना महिन्याभरात सर्व रक्तपेढ्यांची तपासणी करुन तपासणीचा अहवाल माहे मे,२०२५ पर्यंत सादर करण्याचे आदेश आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील रक्तपेढ्यांची बळकटीकरण करण्याच्यादृष्टीने कोणकोणत्या घटकांची तपासणी करण्यात येते तसेच, रक्तपेढ्यांची तपासणी करण्यासाठी रक्त संक्रमण सेवेतील तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, रक्त व रक्त घटकांचा पुरवठा वेळेत करीत नसलेल्या रक्त पेढ्यांवर शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (०९-०७-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) राज्य रक्त संक्रमण परिषदेचे पत्र दिनांक १८/३/२०२५ नुसार सर्व जिल्हा शल्य चिकित्सक व अधिष्ठाता, वैद्यकिय महाविद्यालय यांना त्यांच्या अधिपत्याखालील जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी पॅथॉलॉजी वर्ग-१ किंवा रक्त संकमण सेवेतील तज्ञ यांना रक्तकेंद्रांना भेट देऊन तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच त्यासोबत रक्त केंद्र तपासणीसाठी तपासणीसूची पाठविण्यात आली असून त्यामध्ये थोडक्यात वार्षिक रक्त संकलन, वार्षिक रक्तांचे वितरण, गुणवत्ता नियंत्रण प्रणालीची उपलब्धता इत्यादी बाबतची तपासणी करण्याचे कळविण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हा रक्त संक्रमण अधिकाऱ्यांनी ३९१ रक्तकेद्रांपैकी ३४० रक्तकेंद्रांची तपासणी करण्यात आली आहे.

(४) रक्त व रक्त घटकांचा पुरवठा रक्तकेंद्रामार्फत वेळेत करण्यात येतो. याबाबत राज्य रक्त संक्रमण परिषदेकडे कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खेड (जि.पुणे) तालुक्यामध्ये जल जीवन अभियानाच्या अंमलबजावणीबाबत

**(३६) १११६५ (१९-०९-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यामध्ये जल जीवन अभियानाची अंमलबजावणी करण्यात येवून नॅशनल बिल्डिंग कोड २०१६ नुसार घरांना नळाच्या पाण्याचे कनेक्शन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जल जीवन मिशन ग्रामीण भागात शाश्वत पाणी व्यवस्थापन पद्धती सुनिश्चित करण्यात येवून पीएमआरडीए हद्दीत असलेल्या गावांचे भूजल पुनर्भरण करण्यासाठी कोणते उपाय करण्यात आले आहेत,

(३) असल्यास, खेड आळंदीमधील जल जीवन मिशन प्रकल्पांच्या नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये स्थानिक समुदाय कोणती भूमिका बजावतो तसेच सदर किती योजना स्थानिक स्वराज्य संस्था यांना हस्तांतरण करण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने जल जीवन मिशन ग्रामीण भागातील पाण्याच्या गुणवत्तेच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२६-०५-२०२६) :** (१) जल जीवन अभियानाची अंमलबजावणी "IMIS (Integrated Management Information System) म्हणजेच एकात्मिक व्यवस्थापन माहिती प्रणाली" या संकेतस्थळावरील नोंदीनुसार शिल्लक FHTC असलेल्या घरांना पाण्याचे कनेक्शन देण्यात येत आहे.

(२) जल जीवन मिशन अंतर्गत खेड तालुक्यातील पीएमआरडीए हद्दीत असलेल्या २३ गावांची पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहे. या २३ पाणी पुरवठा योजनांचा उद्भव भुपृष्टीय उद्भव आहे व भूजल पुनर्भरण करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत उपाययोजना करण्यात येत नाहीत.

तसेच जिल्हा परिषद मार्फत खेड तालुक्यातील पीएमआरडीए हददीत असलेल्या ८८ गावांचे पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहे. भुजल पुर्नभरण करणेसाठी भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेमार्फत निश्चित केलेल्या स्त्रोतांच्या बळकटीकरणासाठी उपाययोजना राबविणेत येतात.

(३) खेड आळंदी मधील जल जीवन मिशन प्रकल्पांच्या नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये स्थानिक ग्रामपंचायतींच्या मदतीने तांत्रिकदृष्ट्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येते. योजना पुर्णत्वः नंतर पाणी पुरवठा योजना स्थानिक स्वराज्य संस्था यांना हस्तांतरण करण्यात येते. आज अखेर २९ योजना पूर्ण झालेने ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत.

(४) उक्त प्रकरणी चौकशी करण्याची गरज भासली नसून, जल जीवन मिशन अंतर्गत खेड तालुक्यातील ग्रामीण भागातील पाण्याच्या गुणवत्तेच्या समस्या सोडविण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत भुपृष्ठीय उद्भव घेऊन तसेच जिल्हा परिषदेमार्फत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी सुचविलेनुसार आवश्यकतेप्रमाणे जलशुध्दीकरण केंद्राद्वारे स्वच्छ, शुध्द व निर्जंतुक पाणी पुरवठा नागरिकांना करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खेड तालुक्यात महिला सक्षमीकरण आणि बालविकासाला चालना देण्याबाबत

**(३७) ११६५७ (३०-०७-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यात महिला सक्षमीकरण आणि बालविकासाला चालना देण्यासाठी शासनाने कोणते विशिष्ट उपक्रम हाती घेतले आहेत काय,

(२) असल्यास, तालुक्यातील आरोग्य, शिक्षण आणि महिला आणि मुलांचे संरक्षण यासारख्या समस्या सोडवण्यासाठी कोणते उपाय राबविण्यात येत आहेत,

(३) असल्यास, तालुक्यातील महिला आणि बाल विकास कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आणि देखरेख सुनिश्चित करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे,

(४) तसेच, तालुक्यातील मागील ५ वर्षात दाखल झालेल्या तक्रारींवर महिला आयोग व बाल हक्क आयोग यांचा अंतिम निर्णय झाला आहे काय

(५) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**कुमारी आदिती तटकरे (२१-०४-२०२६) :** (१), (२) व (३) महिला सक्षमीकरण आणि बाल विकासाला चालना देण्यासाठी महिला व बालकांसाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. महिलांसाठी माझी लाडकी बहीण योजना, संकटग्रस्त व अत्याचारग्रस्त महिलांसाठी वन स्टॉप सेंटर, महिला राज्यगृहे / आधागृहे इ. योजना राबविण्यात येतात. तसेच बालकांसाठी काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी बालगृह असुन यामध्ये बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, शालेय शिक्षण, प्रशिक्षण इ.सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. तसेच बाल विवाहास प्रतिबंध घालण्यासाठी बाल विवाह कायद्यांतर्गत बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमांतर्गत संरक्षण अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत.

काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी बाल संगोपन योजना राबविण्यात येते. पुर्णत: अनाथ असलेल्या बालकांना अनाथ प्रमाणपत्र वितरीत करण्यात येते.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातुन गरजु व संकटातील महिलांना शासकीय महिला वसतिगृहे, वन स्टॉप सेंटर, महिला हेल्पलाईन, चाईल्ड हेल्पलाईन, बालगृहे, शक्ती सदन, सखी निवास इ. योजनांच्या माध्यमातुन त्यांच्या प्रकरणानुसार आवश्यक ती सहायता देऊन त्यांचे समाजात पुनर्स्थापन करण्यात येते.

महिला सक्षमीकरण आणि बाल विकासाला चालना देण्यासाठी महिला व बालकांसाठी असलेल्या योजनांची प्रसिध्दी व अंमलबजावणी करण्यात येते. तसेच आवश्यकतेनुसार सर्वतोपरी मदत करण्यात येते.

(४) महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयात खेड तालुक्यामधून ५ वर्षात एकूण ३८ तक्रारी प्राप्त झाल्या असून, सदर तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत.

तसेच महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोगाकडे ८ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्यापैकी २ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. उर्वरित प्रकरणांवर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एमआयडीसी क्षेत्रातील उद्योगाविना पडून असलेले प्लॉट स्थानिक उद्योजकांना उपलब्ध करुन देणेबाबत**

**(३८) ११६८९ (३०-०७-२०२५). श्री.विलास भुमरे (पैठण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध उद्योग यावेत, लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, राज्याच्या महसुलात वाढ व्हावी यासाठी एमआयडीसी क्षेत्रामध्ये उद्योगाच्या उद्देशाने घेतलेले प्लॉट उद्योजकांकडे उद्योगाविना वर्षानुवर्षे पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्षेत्रातील वापराविना पडून असलेले प्लॉट स्थानिक उद्योजकांना उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक उद्योजकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन त्यानुसार स्थानिक उद्योजकांना प्लॉट उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०४-२०२६) :** (१), (२) व (३) खरे नाही.

मऔवि महामंडळातर्फे उद्योजकांना भूखंडाचे वाटप केल्यानंतर भूखंडाचा विकास करण्यासाठी निश्चित विकसन कालावधी दिला जातो. दिलेल्या विकसन कालावधीत उद्योजकाने भूखंडाचा विकास करुन उत्पादनात जाणे अपेक्षित असते. तथापि, काही कारणास्तव उद्योजकाने भूखंडाचा विकास न केल्यास व त्याने मुदतवाढीची मागणी केल्यास जास्तीत जास्त चार सशुल्क मुदतवाढी मंजूर केल्या जातात. त्यानंतर सुध्दा उद्योजकाने भूखंडाचा विकास न केल्यास, मऔवि महामंडळाच्या धोरणानुसार भूखंड जप्तीची कार्यवाही केली जाते.

त्यानुषंगाने मऔवि महामंडळाने दिनांक ०१/०५/२०१९ ते दिनांक ३०/०६/२०२५ पर्यंत एकूण २०४१ भूखंड जप्त केले असून, भूखंडांखालील क्षेत्र १३०९.७१ हे.आर. आहे.

जप्त (Forfeit) केलेले भूखंड मऔवि महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार उद्योजकास वाटप केले जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात मंजुरी दिलेली मात्र अपूर्ण असलेली जलसंधारणाची कामे पूर्ण करणेबाबत**

**(३९) १२११७ (१९-०९-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००१ ते २०२४ या कालावधीत मंजुरी दिलेली मात्र अद्याप सुरू न झालेली व अपूर्ण असलेली सुमारे रु.१५०० कोटी रुपयांची जलसंधारणाची कामे रद्द केली जाणार असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना विभागाला देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सन २००१ ते २०२४ मधील अपूर्ण कामे रद्द न करता ती पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०४-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रगतीपथावरील अपूर्ण कामे रद्द न करता प्राधान्यक्रम ठरवून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर शहर आणि जिल्ह्यातील रक्त पेढ्यांमध्ये रक्तांचा तुटवडा दूर करणेबाबत**

**(४०) १२१२१ (०८-०९-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहर आणि जिल्ह्यातील रक्त पेढ्यांमध्ये रक्तांचा तुटवडा भासत असल्याने रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना रक्त टंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या मेडिकल रक्तपेढीत केवळ ३० युनिट होल ब्लड च्या बॅग शिल्लक असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नागपूर शहर आणि जिल्ह्यातील रक्त पेढ्यांमधील रक्तांचा तुटवडा दूर करण्यासाठी कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (०९-०७-२०२६) :** (१) हे खरे नाही.
नागपूर शहर व जिल्हयातील रक्तकेंद्रांमध्ये दिनांक ०७/०५/२०२५ ते दिनांक १५/०५/२०२५ या कालावधीमध्ये प्रतिदिन सरासरी २३०० (किमान २१६५ ते कमाल २४१६ दरम्यान) युनिट रक्तसाठा उपलब्ध होता.
(२) हे खरे नाही.
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवडयामध्ये सरासरी १५० (किमान ९८ ते कमाल १७२ दरम्यान) युनिट रक्तपिशव्या उपलब्ध होत्या. मे, २०२५ महिन्याचे एकुण रक्त संकलन ८६२ रक्तपिशव्या एवढे होते.
(३) रक्तदान शिबीरे व रक्त संकलन ही सततची व सातत्याने होणारी प्रक्रीया असुन रक्ताचा वापर व रक्तदानद्वारे भरपाई होणे ही शृंखला सतत सुरु आहे. तसेच गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विटा ते पलूस (जि. सांगली) एमआयडीसीला जोडणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४१) १२१३९ (१९-०९-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विटा ते पलूस (ता. खानापूर, जि. सांगली) एमआयडीसीला जोडणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावाला विशेष बाब म्हणून मंजूरी देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. उद्योग मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्ताव कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, सांगली यांचेकडून मुख्य अभियंता,

एमआयडीसी मुंबई यांचे स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, औद्योगिक क्षेत्रासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध होण्याकरिता सदर एमआयडीसींना जोडणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रस्तावित विटा ते पलूस (जि.सांगली) हा २०.३० कि.मी. लांबीचा रस्ता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्राबाहेरील असून, जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत आहे. सद्य:स्थितीत म.औ.वि. महामंडळाकडे निधीचा तुटवडा असल्यामुळे सदर रस्ता दुरुस्तीच्या प्रस्तावित खर्चाकरीता अनामत रक्कम जिल्हा परिषद किंवा अन्य शासकीय यंत्रणेकडून प्राप्त होणार आहे किंवा कसे याबाबत प्रस्तावात उल्लेख नसलयाने सदर प्रस्ताव मऔवि महामंडळाच्या स्थानिक कार्यालयाकडे परत पाठविण्यात आला आहे.
(३) सदर रस्ता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्राबाहेरील असल्यामुळे व जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येत असल्याने रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी ही जिल्हा परिषद, सांगली यांची आहे. सबब, यानुषंगाने मऔवि महामंडाळाच्या दिनांक १७/०२/२०२६ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सांगली यांना निधी उपलबध करुन देण्याची विनंती करण्यात आली आहे. सदर निधी प्राप्त झाल्यानंतर मऔवि महामंडळाकडून पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील तोट्यात असलेली महामंडळे बंद करणेबाबत

**(४२) १२२४९ (१९-०९-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मोठी गुंतवणूक आणण्यासाठी शासन कार्यवाही करीत असताना गुंतवणुकीच्या दृष्टीने महत्वाचे महामंडळ असलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला (एमआयडीसी) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात ७ हजार ३३७ कोटी रुपये इतकी तूट नोंदविण्यात आल्याची माहिती एमआयडीसीने दिनांक ७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तुटीच्या अर्थसंकल्पामुळे पुढील दोन वर्षातील आर्थिक दायित्वाचा भार वाढत असून सद्यःस्थितीत शासनाच्या एकूण महामंडळापैकी किती महामंडळे आर्थिकदृष्ट्या तोट्यात आहेत त्यापैकी किती महामंडळांनी आर्थिक तोटा भरुन काढण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुषंगाने सदर तोट्यातील महामंडळे बंद करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०६-२०२६) :** (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या अनुषंगाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रु.१३९९.८८ कोटी इतकी तूट आहे.
(२) व (३) उद्योग विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी संबंधित वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे:-

१. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ नुसार महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक क्षेत्रात व औद्योगिक वसाहतीत उद्योगधंद्याची पध्दतशीर स्थापना आणि त्यांची घडण करण्याच्या आणि त्यासाठी मदत

देण्याच्या प्रयोजनाकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

२. मऔवि महामंडळाला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रु.१२९२.०८ कोटी इतकी महसूली जमा प्राप्त झाली असून रु.२२५९.७२ कोटी इतका महसूली खर्च झालेला आहे. त्यानुसार, रु.९६७.६४ कोटी इतकी महसूली तूट आली आहे.

३. महसूली खर्चामध्ये मऔवि महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये केला जाणारा देखभाल व दुरुस्ती खर्च वाढलेले पाण्याच्या रॉयल्टीचे दर व वीजेचे दर आणि कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अशा प्रमुख बाबींचा समावेश होतो. सदरचा खर्च अनिवार्य असल्यामुळे तूट दिसून येते.

४. मऔवि महामंडळाला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रु.४४७२.२५ कोटी इतकी भांडवली जमा प्राप्त झाली असून रु.४९०४.४९ कोटी इतका भांडवली खर्च झालेला आहे. त्यानुसार, रु.४३२.२४ कोटी इतकी भांडवली तूट आली आहे.

५. भांडवली खर्चामध्ये महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये बांधल्या जाणाऱ्या रस्ते, पथ दिवे, पाणी पुरवठा योजना, जलनिःसारण योजना, इमारती अशा प्रमुख बाबींचा समावेश होतो. राज्याच्या औद्योगिक विकासाच्या धोरणाच्या अनुषंगाने सदरचा खर्च करण्यात आला आहे.

६. सदरची तूट मऔवि महामंडळाकडे असलेल्या उपलब्ध मुदत ठेवींमधून भरुन काढण्यात आली आहे.

७. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आर्थिक स्थितीच्या अनुषंगाने राज्य शासनाकडून महामंडळास अनुदान वा अर्थसहाय्य मिळणेसाठी मऔवि महामंडळाच्या दिनांक २४/०९/२०२४, ०६/०१/२०२५ , २९/१२/२०२५ च्या पत्रांन्वये विनंती करण्यात आली आहे. त्यानुषंगाने शासनाच्या निर्देशानुसार मऔवि महामंडळाने सुधारित वित्तीय आराखडा सादर केला असून, या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

८. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ०९/०५/२०२५ रोजीच्या ४०६ व्या बैठकीमध्ये मऔवि महामंडळास स्वतःसाठी अर्थप्राप्तीचे पुरेसे मार्ग प्राप्त करुन घेण्यासाठी कर्ज प्राप्त करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रीरामपूर (जि.अहिल्यानगर) येथे सहकारी औद्योगिक वसाहतीस मूलभूत सुविधा पुरवणेबाबत

**(४३) १२२७५ (१९-०९-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहिल्यानगर) येथे सन १९६१ साली जिल्ह्यातील स्थापन झालेल्या प्रथम सहकारी औद्योगिक वसाहतीस लागणाऱ्या मूलभूत सुविधांसाठी सहकारी औद्योगिक वसाहतीकडून शासन २५% खर्च वसूल करते व उर्वरित ७५% खर्च शासन करते असे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) अंतर्गत असणाऱ्या औद्योगिक वसाहतीतील मूलभूत सुविधांचा सर्व खर्च शासन करते असे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, सदर जिल्हयाच्या सहकारी औद्योगिक वसाहतीची आर्थिक क्षमता नसल्यामुळे मूलभूत

सुविधांसाठी औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) अंतर्गत असणाऱ्या औद्योगिक वसाहतींप्रमाणे शासनाने सर्व खर्च करावा किंवा या सहकारी औद्योगिक वसाहतीस औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) अंतर्गत समाविष्ट करावे अशी येथील उद्योजकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२०-०४-२०२६) :** (१) राज्यातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये अंतिम टप्प्याची रस्ते जोडणी, अंतर्गत रस्ते, पथदिवे, वीजपुरवठा, समर्पित विद्युत संच व वाहिनी, पाणीपुरवठा इ. पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती व विकास योजनेंतर्गत ७५:२५ (राज्य शासन : संस्थेचा हिस्सा) अर्थसहाय्य करण्यात येते.

श्रीरामपूर सहकारी औद्योगिक अहिल्यानगर येथे रस्ते व पाईपलाईन उभारणीसाठी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावातील अंदाजपत्रकास उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अहिल्यानगर यांचेकडून तांत्रिक मान्यता घेण्यात आली होती. तथापि, सहकारी संस्थेमार्फत धोरणातील तरतुदीनुसार परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात आले नसल्याने सदर प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(२) हे खरे नाही,

महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाअंतर्गत असलेल्या औद्योगिक वसाहतीतील मुलभूत सुविधा उभारणीसाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या उपलब्ध निधीतून खर्च करण्यात येतो.
(३) श्रीरामपूर येथील सहकारी औद्योगिक वसाहतीतील मूलभूत सुविधांसाठी शासनाकडून १००% सहाय्य करण्याबाबत श्री. हेमंत ओगले, मा. विधानसभा सदस्य, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर यांनी मा. सहकार मंत्री महोदयांना दिनांक ५ एप्रिल, २०२५ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील औद्योगिक वसाहतीमधील अग्निशमन सेवांबाबत

**(४४) १२२७६ (१९-०९-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) अंतर्गत असणाऱ्या सर्व औद्योगिक वसाहतींमध्ये अग्निशमन सेवा या महामंडळाच्या संचालक मंडळाच्या ठराव क्रमांक २७९१ नुसार ना नफा ना तोटा तत्त्वावर चालवली जात असुन या सेवेच्या दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी उद्योजकांकडून अग्निशमन सेवा शुल्क (फायर सेस) त्यांच्या भूखंडाच्या क्षेत्रफळानुसार आकारले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अग्निशमन सेवा शासन अथवा औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) यांनी स्वखर्चाने राबवावी अशी उद्योजकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाकडून कोणती धोरणात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०५-२०२६) :** (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत ३५ औद्योगिक क्षेत्रांमध्ये अग्निशमन केंद्र कार्यान्वित करुन अग्निशमन सेवा ना नफा ना तोटा या तत्वावर पुरविली जाते.

अग्निशमन केंद्राच्या दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी मऔवि महामंडळाच्या ठराव क्र.२९३२ अन्वये परिपत्रक क्र.CAO/AR/G-८८/८६५६, दिनांक ०५/११/१९९३ नुसार अग्निशमन सेवा शुल्क (फायर सेस) आकारले जाते.

(२) व (३) हे खरे नाही.

अग्निशमन सेवा शासन अथवा औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) यांनी स्वखर्चाने राबवावी अशा प्रकारचे कोणतेही निवेदन मऔवि महामंडळास प्राप्त झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तालमवाडी (ता.तूळजापूर, जि.धाराशिव) येथे औद्योगिक क्षेत्रासाठी जमिन संपादनाची कार्यवाही करण्याबाबत

**(४५) १२५२५ (१९-०९-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालमवाडी (ता.तूळजापूर, जि.धाराशिव) येथे औद्योगिक क्षेत्रासाठी (एमआयडीसीसाठी) जमिन संपादनाची कार्यवाही करण्याकरीता शासनाने बाधित शेतकऱ्यांच्या समवेत दोन बैठका आयोजित केल्या होत्या परंतू बाधित शेतकऱ्यांनी काही शंका उपस्थित केल्यावर प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे दिनांक २९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एमआयडीसी करीता संपादीत करण्यांत येणाऱ्या जमिनीच्या मोबदल्यात एकरी अंदाजे रु. २५ ते ३५ लाख इतक्या रुपयांपर्यंत मावेजा देण्याचे निश्चीत केले असून सोबतच बाधीत जमिनीत शेड, झाडे, विहीर, बोरवेल असल्यास त्याचे मुल्यांकन करुन वाढीव मोबदला देण्यांबाबत निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक उद्योजकांना या नियोजित एमआयडीसी मध्ये उद्योग उभारणी करण्यास इच्छूक असल्यास प्रकल्पग्रस्तांसाठी १० टक्के भूखंड राखीव ठेवणे गरजेचे आहे परंतू त्या बाबतही प्रशासनाकडून अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.

तामलवाडी येथे म.औ.वि. महामंडळाचे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मौजे तामलवाडी ता. तुळजापूर जि. धाराशिव येथील १४६.७२ हे. आर क्षेत्रास उच्चाधिकार समितीने मंजूरी प्रदान केली आहे. त्यानुसार सदर क्षेत्रास प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) च्या तरतुद लागू करण्याबाबतची अधिसुचना दिनांक ०४/०७/२०२४ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच कलम ३२ (२) च्या वैयक्तिक नोटीसा शेतकऱ्यांना देण्यात आल्या असता, संबंधित शेतकऱ्यांनी भूसंपादनास विरोध दर्शविला होता. त्यामुळे कलम ३२ (२) नोटीसांवर शेतकऱ्यांचे म्हणणे जाणून घेण्यासाठी उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, धाराशिव यांनी सदर शेतकऱ्यांसमवेत दिनांक २३/०१/२०२५ रोजी उप विभागीय कार्यालय, धाराशिव येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत ज्या शेतकऱ्यांची भूसंपादनाला सहमती आहे केवळ अशा जमिनीची मोजणी करण्याचे ठरले होते. त्यानुसार मोजणीला संमती दिलेल्या ५८.८० हे. आर क्षेत्राची मोजणी पूर्ण झालेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी १४६.७२ हे. आर क्षेत्रास मऔवि अधिनियम १९६१ चे कलम ३२ (२) लागू करण्याबाबतची अधिसूचना दिनांक २७/०३/२०२५ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

दिनांक २२/०५/२०२५ रोजी उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, धाराशिव यांचे अध्यक्षतेखाली तहसिल कार्यालय, तुळजापूर येथे भूसंपादनाबाबत संबंधित शेतकऱ्यांसमवेत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये भूसंपादनाच्या पुढील कार्यवाहीच्या अनुषंगाने संबंधित शेतकऱ्यांनी प्रस्तावित भूसंपादनास विरोध दर्शविला आहे. तसेच दिनांक २२/०७/२०२४, दिनांक २३/०८/२०२४, दिनांक २१/०१/२०२५, दिनांक २४/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये संबंधित भूधारकांनी सदर भूसंपादनास विरोध असल्याचे कळविले आहे. त्यामुळे भूसंपादनाची पुढील कार्यवाही स्थगित आहे.

(२) हे खरे नाही.

दर निश्चिती वेळी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळणेचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम २६-३० नुसार दर परिगणित करुन जिल्हाधिकारी यांचेकडून दर निश्चितीचा प्रस्ताव मऔवि महामंडळास प्राप्त होतो. सदर प्रस्तावित दरास उच्चाधिकार समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावित क्षेत्राकरिता भूसंपादनाचा मोबदला दर निश्चित करण्यात येतो.

(३) व (४) हे ही खरे नाही,

सदर औद्योगिक क्षेत्राच्या भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर मऔवि महामंडळाच्या पुनर्वसन व पुनर्बहाली धोरण २०१९ अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक क्र. सी ८३११८, दिनांक २६/०८/२०१९ अन्वये प्रकल्पग्रस्तांसाठी १० टक्के भूखंडाचे आरक्षण ठेवण्याबाबतची कार्यवाही करता येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयतील शवागारात कोल्ड कॅबिनेट उपलब्ध करुन देणेबाबत

**(४६) १२९३८ (०८-०९-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयतील शवागारात असलेल्या दोन कोल्ड कॅबिनेट गेल्या दीड वर्षापासून बंद असून सदर कॅबिनेट दुरुस्त होऊ शकत नसल्याबाबत देखभाल दुरुस्ती करणाऱ्या संबंधित कंपनीकडून कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत एकही कोल्ड कॅबिनेट कार्यरत नसल्यामुळे सदर रुग्णालयातील मृतदेहाची ओळख पटेपर्यंत मृतदेह पोस्ट मार्टम रुममध्येच ठेवावे लागत असल्याने त्याची दुर्गंधी परिसरात पसरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त उपजिल्हा रुग्णालयातील शवागारात तात्काळ दोन कोल्ड कॅबिनेट उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मे,२०२५ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने उपजिल्हा रुग्णालयास कोल्ड कॅबिनेट उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२३-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत जिल्हा शल्य चिकित्सक, सोलापूर यांचे मार्फत एक कोल्ड कॅबिनेट तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सद्य:स्थितीत जिल्हा शल्य चिकित्सक, सोलापूर यांचेमार्फत एक कोल्ड कॅबिनेट तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

तसेच सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात राज्यातील कार्यरत रुग्णालये करीता आवश्यक यंत्रसामुग्री व साधन सामुग्री खरेदीसाठी प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यामध्ये मॉर्च्युरी कोल्ड कॅबिनेट या बाबीचा समावेश असून सदर बाबीची खरेदी प्रक्रिया पुर्ण झाल्यावर उपजिल्हा रुग्णालय, करमाळा करीता कोल्ड कॅबिनेट उपलब्ध होणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यात आयुष्मान भारत कार्ड उपलब्ध करणेबाबत

**(४७) १३०३० (३०-०७-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मोफत आरोग्य सेवा योजनांसाठी शिधापत्रिकऐवजी आयुष्मान भारत कार्ड बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात आतापर्यंत किती जणांना आयुष्मान भारत कार्ड देण्यात आले आहे व उर्वरीत नागरीकांना तातडीने आयुष्मान कार्ड उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (०१-०७-२०२६) :** (१) हे खरे आहे.

सद्य:स्थितीत, दिनांक २४/२/२०२६ पासून आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना एकत्रित योजना राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या TMS २.० प्रणालीवर कार्यान्वित करण्यात आली आहे, तसेच, या योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यासाठी "आयुष्मान कार्ड" असणे अनिवार्य करण्यात आले आहे. या प्रक्रियेमध्ये, ज्या लाभार्थ्यांची नावे BIS पोर्टलमध्ये आढळत नाहीत, अशा लाभार्थ्यांना PVTG मोड्यूलद्वारे नोंदणी आणि ई केवायसी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर योजनेचे लाभ दिले जात आहेत.

(२) TMS २.० प्रणालीवर रूग्णनोंदणी करताना लाभार्थ्यांकडे आयुष्मान कार्ड असणे अनिवार्य आहे.

(३) सोलापूर जिल्ह्यात एकत्रित योजनेंतर्गत ४०,९१,९९६ लाभार्थी असुन दिनांक ७/५/२०२६ पर्यंत १५,५८,२६० लाभार्थ्यांची ई-केवायसी करुन आयुष्मान कार्डांचे निर्माण करण्यात आले आहे.

सर्व लाभार्थ्यांना गुगल प्ले-स्टोरमधील आयुष्मान ॲप अथवा beneficiary.nha.gov.in या संकेतस्थळावरील beneficiary पर्यायाद्वारे स्वत:चे कार्ड स्वत: तयार करता येते. तसेच, क्षेत्रीय स्तरावरील आशा, स्वस्त धान्य दुकान चालक व आपले सरकार सेवा केंद्रातील कर्मचारी यांचेमार्फ़तदेखील लाभार्थ्यांच्या कार्ड निर्माणाचे सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.

शासन स्तरावरुन व राज्य आरोग्य हमी सोसायटी कडून जिल्हाधिकारी (सर्व), मुख्य कार्यकारी

अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) व आयुक्त महानगरपालिका (सर्व) यांना उर्वरित लाभार्थ्यांच्या आयुष्मान कार्डांचे निर्माण करण्याकरीता वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परसूल (ता.चांदवड,जि.नाशिक) येथील गरोदर महिलेवर उपचार करण्यास उपजिल्हा रुग्णालयात टाळाटाळ झाल्याबाबत**

**(४८) १३२२३ (२३-०९-२०२५). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परसूल (ता.चांदवड, जि.नाशिक) येथील गरोदर महिलेवर उपचार करण्यास चांदवड उपजिल्हा रुग्णालयात टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप करत याबाबत चौकशी करून संबंधीत डॉक्टर व परिचारिका यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी काही सामाजिक कार्यकर्त्यांनी बेमुदत उपोषणाद्वारे केल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार दोषी असणाऱ्या संबंधीत डॉक्टर व परिचारिका यांच्यावर शारसनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१३-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) जिल्हा शल्यचिकित्सक नाशिक यांचे स्तरावरुन करण्यात आलेल्या चौकशीमध्ये उपजिल्हा रुग्णालय चांदवड, जि. नाशिक येथील वैद्यकीय अधिकारी व अधिपरिचारीका यांनी रुग्णास उपचार देण्यास टाळाटाळ केली नसल्याचे दिसुन येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव पेठ (जि.अमरावती) औद्योगिक वसाहत येथे कामगारांकरिता रुग्णालयाची उभारणी करणेबाबत**

**(४९) १३३६९ (१९-०९-२०२५). श्री.राजेश वानखडे (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव पेठ (जि.अमरावती) औद्योगिक वसाहतीमध्ये (MIDC) राज्य कामगार विमा महामंडळाच्या कामगारांकरिता १०० खाटांच्या अद्यावत रुग्णालयाच्या उभारणीस मान्यता दिली असून या रुग्णालयाला येथे भूखंड वितरीत करण्यास राज्य मंत्रीमंडळानेही मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूखंड अद्यापही कर्मचारी राज्य विमा महामंडळास (ESIC-Employees’ State Insurance Corporation) हस्तांतरित केला नाही, याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर भूखंड देण्याकरिता औद्योगिक वसाहतीद्वारे (MIDC) कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC-Employees’ State Insurance Corporation) ला ऑफर लेटर सुद्धा दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुषंगाने सदर

रुग्णालयाला नांदगाव पेठ औद्योगिक वसाहतीमध्ये भूखंड वितरीत करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-०३-२०२६) :** (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्यालयीन भूखंड वाटप समितीच्या दिनांक ०९/०८/२०२४ बैठकीत कर्मचारी राज्य विमा निगम (ESIC) यांना २०,००० चौ मी भूखंड वाटपास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही
(३) व (४) हे खरे आहे.

म.औ.वि. महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालय अमरावती यांच्या पत्र क्र २०२४११०००२८१, दिनांक ०४/०९/२०२४ अन्वये इसारा रक्कम भरणेकरीता देकार पत्र निर्गमित करण्यात आलेले होते. इसारा रक्कमेचा भरणा केल्यानंतर अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्र (नांदगाव पेठ) येथिल सुविधा क्षेत्र मधील भूखंड क्र पीआय-१/२ क्षेत्र २०,००० चौ.मी. बाबत उर्वरित रक्कमेचा भरणा करणेकरीता वाटपपत्र निर्गमित करण्यात आलेले आहे.

कर्मचारी राज्य विमा महामंडळ यांनी उर्वरीत रक्कमेचा भरणा केल्यानंतर अमरावती औद्योगिक क्षेत्र (नांदगाव पेठ) येथिल सुविधा क्षेत्र मधील भूखंड क्र. पीआय-१/२ क्षेत्र २०,००० चौ.मी. भूखंडाचा दिनांक २३/०९/२०२५ रोजी आगावू ताबा देण्यात आलेला आहे. तद्नंतर दिनांक ०८/१२/२०२५ च्या पत्रान्वये प्राथमिक करारनाम्याचा मसुदा निर्गमित करण्यात आलेला असून, कर्मचारी राज्य विमा महामंडळ यांचे कडून अद्यापर्यंत प्राथमिक करारनामा करण्यात आलेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भोसरी (जि.पुणे) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील मोकळे प्लॉट उद्योजकांना नवउद्योग उभारण्याकरता वितरित करणेबाबत

**(५०) १३४५२ (१९-०९-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोसरी (जि.पुणे) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील मागील १७ वर्षात १२६ कंपन्या बंद पडल्याने व अनेक कंपन्या स्थलांतरित झाल्या असल्याने भूखंड मालकांनी औद्योगिक आरक्षण हटवून सदर भूखंड वाणिज्य तसेच निवासी केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भोसरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ वाटप करण्यात आलेल्या भूखंडांवर कंपन्यांनी उभारणी केली नसल्याने अनेक भूखंडे हे रिकामे आहेत तसेच महानगरपालिकेनेही अनेक भूखंड विकसित केले नसल्याने विनावापर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील सुमारे ३८०० प्लॉट हे उद्योजकांना उद्योग उभे करण्याकरिता वाटपाअभावी देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बंद पडलेल्या कंपनीचे भूखंड ताब्यात घेणे, भोसरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील मोकळे प्लॉट उद्योजकांना नवउद्योग उभारण्याकरिता वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२०-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत पिंपरी औद्योगिक क्षेत्रामध्ये बंद औद्योगिक कंपन्यांची संख्या ३२ इतकी आहे. सदर बंद औद्योगिक कंपन्यांना म.औ.वि. महामंडळाचे परिपत्रक क्र.पी-२०५६२६ दिनांक १५/०३/२०२४ अन्वये उद्योग पुनःश्च सुरू करण्याकरीता भुखंडाच्या क्षेत्रनिहाय कालावधी दिलेला आहे. मात्र सदर कालावधीत उद्योजक भुखंडाचा विकास करण्यास ईच्छुक नसेल तर सदर कालावधीत पोट भाडे/ सबलिजने देणे किंवा हस्तांतर करण्याकरीता किंवा आपल्या भुखंडावरील अतिरिक्त जागा शिल्लक असल्यास ती म.औ.वि. महामंडळास परत देणेबाबत भूखंडधारकांना नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.

सद्य:स्थितीत सदर भूखंडाबाबत कोणताही वाणिज्य तसेच निवासी भूखंडात रुपांतर करणेचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

म.औ.वि. महामंडळाचे परिपत्रक क्रमांक १७९२१ दिनांक ०५/०९/२०१३, डी०७७१७ दिनांक ०४/१०/२०१३, बी ७७७९९ दिनांक २६/०५/२०२२ व पी ३८४३१४ दिनांक २४/०२/२०२५ नुसार औद्योगिक भूखंडाचे व्यापारी भूखंडात रुपांतर करण्याबाबत म.औ.वि. महामंडळाचे धोरण आहे.

(२), (३) व (४) सद्य:स्थितीत पिंपरी औद्योगिक क्षेत्रामध्ये औद्योगिक भूखंड वाटपास उपलब्ध नाही. व्यापारी ४ भूखंड व निवासी १ भूखंड उपलब्ध असून सदर भूखंड महामंडळाच्या संगणक प्रणाली मिलाप या संकेतस्थळावरुन निविदेव्दारे वाटपास उपलब्ध करुन देण्यात आलेले होते. सदर भूखंडांना अर्ज प्राप्त झालेले असून वाटप प्रक्रिया सुरु आहे.

सद्य:स्थितीत पिंपरी औद्योगिक क्षेत्रामध्ये बंद औद्योगिक कंपन्यांची संख्या ३२ इतकी आहे. सदर बंद औद्योगिक कंपन्यांना महामंडळाचे परिपत्रक क्र. पी-२०५६२६, दिनांक १५/०३/२०२४ नुसार भूखंडधारकांना नोटीसा या कार्यालयामार्फत बजाविण्यात आलेल्या आहे. पिंपरी औद्योगिक क्षेत्रात भूखंडावर बांधकाम न केल्याने जागेवर रिकामे असलेल्या २ भूखंडधारकांना नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**

**मुंबई.** **सचिव-१,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.